सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०७ नोव्हेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक २११ पाने : ८ किंमत रु. ६/- ınbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### राज ठाकरेंचे निष्क्रिय शाखाध्यक्षांना थेट काढून टाकण्याचे आदेश



पुणे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे आज पुण्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत कमालीचे संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले. कामाचा निरुत्साह आणि अपेक्षित कामगिरी न दिसल्यामुळे त्यांनी शाखाध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची जोरदार कानउघडणी केली. जर काम करायची इच्छा नसेल, तर लगेच पद सोडा, अशा कठोर शब्दांत राज ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना फटकारले. राज ठाकरे यांनी बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर पदाधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. इतके दिवस तुम्ही काय काम केले, ते दाखवा. मतदार याद्या पूर्ण का केल्या नाहीत? असा थेट आणि रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला. बूथ पातळीवरील कामे, पक्ष बांधणी आणि पक्ष संघटना यांसारख्या विषयांवर पदाधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने राज ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पदाधिकाऱ्यांच्या कामाच्या या थंड प्रतिसादामुळे राज ठाकरे यांचा संताप अनावर झाला. त्यांनी थेट आदेश देत, ज्यांनी काम केले नाही, अशा सर्व पदाधिकाऱ्यांना त्वरित काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. या नाराजीनंतर राज ठाकरे यांनी बैठक लवकर संपवून लगेच निघून जाणे पसंत केले. राज ठाकरे पदाधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर किती गंभीर आहेत, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

### पुण्यातील जमीन खरेदी-विक्री व्यवहारामध्ये मुद्रांक शुल्क चुकविल्याप्रकरणी चौकशीसाठी समिती

मुंबई : पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमीन खरेदी-विक्री व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क चुकविल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक सुहास दिवसे यांच्यामार्फत सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधीक्षक (मुख्यालय), पुणे राजेंद्र मुठे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), पुणे उदयराज चव्हाण, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, धर्मदेव माईनकर, सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर संतोष हिंगाणे, सहाय्यक्र नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.४. नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे अनुजा कुलकर्णी, अति. कार्य. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र. १२, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे संजय पाटील हे या समितीचे सदस्य आहेत. या समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करुन सविस्तर अभिप्रायासह आपला अहवाल ७ दिवसांत सादर करावयाचा आहे.

### न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक - सरन्यायाधीश गवई



मुंबई : न्यायालयीन इमारती या केवळ भव्य नसाव्यात, तर त्या न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे मूर्त रूप असाव्यात. त्या प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेश सुलभ करणाऱ्या ठराव्यात, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले. उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाचा पायाभरणी आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहत परिसरात पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले तसेच न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नमो केंद्रावरून राजकीय वादंग!

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एक नवं वादळ उठलंय. प्रश्न हा आहे की, फक्त तोडण्याची भाषा करणाऱ्यांना राजकारणात स्थान आहे का? महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गडकिल्ल्यांवरील 'नमो केंद्रा'वरून घेतलेल्या आक्रमक भूमिकेवर, शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी आता थेट आणि धारदार टीका केलीय. पहिल्यांदाच शिंदेंनी राज ठाकरेंवर निशाणा साधलाय, आणि त्यांची ही टीका अत्यंत रोखठोक आहे. राज्य सरकारच्या पर्यटन विभागाने शिवरायांच्या गडकिल्ल्यांवर 'नमो केंद्रां'ची उभारणी करण्याची योजना आखलीय. पर्यटकांना माहिती आणि अत्यावश्यक सुविधा मिळाव्यात हा यामागचा उद्देश. पण याच केंद्रांना राज ठाकरे यांनी विरोध दर्शवला आणि ते केंद्र फोडून टाकण्याचा इशारा दिला. हा इशारा देताच खासदार श्रीकांत शिंदे यांनी बुलढाणा येथे राज ठाकरेंवर पलटवार केला. शिंदे म्हणाले, 'राज ठाकरे नमो पर्यटन केंद्र फोडण्याचा इशारा देतात, कारण त्यांच्याकडून आजवर काहीही चांगले झालेले नाही.'

# भाजपची ऐतिहासिक मुसंडी; मतदानाआधीच तब्बल ७५ टक्के जागा बिनविरोध!

## 'गेम' झाल्याचा काँग्रेसचा आरोप, काँग्रेसने घेतली थेट हायकोर्टात धाव!

मुंबई : संपूर्ण देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण तापले असताना, केंद्र शासित प्रदेश असलेल्या दादरा व नगर हवेली आणि दमन व दीव मध्ये एक धक्कादायक राजकीय घडामोड समोर आली आहे. या प्रदेशातील स्थानिक निवडणुकीत भाजपने अभूतपूर्व यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, मतदानाआधीच तब्बल ७५ टक्के जागा बिनविरोध झाल्या असून, यावर काँग्रेसने गंभीर आरोप केले आहेत.

बुधवारी या केंद्र शासित प्रदेशात स्थानिक निवडणुकांसाठी मतदान पार पडले. मात्र, त्यापूर्वीच ग्रामपंचायत, नगरपंचायत आणि जिल्हा पंचायतीच्या प्रमुख पदांच्या निवडणुकीत भाजपचे एकूण १२२ पैकी ९१ उमेदवार बिनविरोध निवडून आले. निवडणुकीपूर्वीच ७५ टक्के जागा भाजपच्या पदरात पडल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.

काँग्रेसचे अर्ज बाद, 'षडयंत्रा'चा आरोप

या मोठ्या राजकीय खेळीमागे 'गेम' झाल्याचा आरोप काँग्रेसने केला



आहे. काँग्रेसचा दावा आहे की, त्यांच्या ८० टक्के उमेदवारांचे अर्ज निवडणुकीच्या रिंगणातून बाद करण्यात आले. याविरोधात काँग्रेसने थेट मुंबई हायकोर्टात धाव घेऊन बाद करण्यात आलेल्या अर्जांना आव्हान दिले आहे.

काँग्रेसचे प्रदेश प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी हे मोठे षडयंत्र असल्याचा आरोप केला. त्यांनी तक्रार केली की, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी फक्त सात दिवसांचा कालावधी दिला गेला. सुरुवातीचे दोन दिवस अर्ज उपलब्ध नव्हते आणि आवश्यक कागदपत्रांची यादीही वेळेवर मिळाली नाही. अर्ज छाननीचे ठिकाण अचानक बदलले गेले, आणि अर्ज भरण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या उमेदवारांना अर्ज बाद झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, भाजपच्या एकाही उमेदवाराचा अर्ज बाद झाला नाही, यावर त्यांनी जोर दिला. दरम्यान, भाजपच्या विजयी उमेदवारांना २४ आणि २५ ऑक्टोबर रोजीच विजयी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

### भाजपची ५ वर्षांत मोठी झेप

बिनविरोध झालेल्या जागांची आकडेवारी भाजपच्या विजयाची कहाणी सांगते.

जिल्हा पंचायती: ४८ पैकी ३५ ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले (मागील वेळी भाजपला फक्त ९ ठिकाणी विजय मिळाला होता).

सरपंच पदे: ४४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांपैकी तब्बल ३० सरपंच भाजपचे बिनविरोध निवडून आले.

दमन: जिल्हा पंचायतीत १६ पैकी १०, पालिकेत १५ पैकी १२ आणि १६ ग्रामपंचायतींपैकी १० मध्ये भाजपचे उमेदवार विजयी झाले.

दीव: आठ जिल्हा पंचायतींपैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले.

दादरा व नगर हवेली: जिल्हा पंचायतीत २६ पैकी २०, १५ नगरपालिका वॉर्डपैकी १४ आणि २६ ग्रामपंचायतींपैकी १८ ठिकाणी भाजपला यश मिळाले.

# पार्थ पवारांच्या कंपनीवरील जमीन घोटाळ्याची चौकशी सुरू

### तहसीलदार निलंबित; कोरेगाव पार्क जमीन व्यवहार



मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीवर होत असलेल्या कथित जमीन घोटाळ्याच्या आरोपांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले असून, राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

याच कथित जमीन घोटाळ्याच्या आरोपांमध्ये, 'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९' मधील नियम ३ चे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत, पुणे शहरचे तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे तातडीने निलंबन करण्यात आले आहे. त्यांच्यावर विभागीय चौकशीचेही आदेश देण्यात आले आहेत.

बेकायदेशीर नोंदणीचा दावा आणि अधिकाऱ्यांवर कारवाई

जमिनीची नोंदणी बेकायदेशीर असल्याचा दावा केला जात असल्याने, मुद्रांक शुल्क विभागानेही स्वतंत्र चौकशी सुरू केली आहे. यासाठी पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या कारवाईचा भाग म्हणून, हवेली क्रमांक ३ चे दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांनाही तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या नागपूर दौऱ्यावर असताना, या जमीन व्यवहार प्रकरणाबद्दल त्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी हे प्रकरण गंभीर असल्याचे सांगत, यासंबंधी अद्याप माझ्याकडे माहिती नाही, मात्र अशी अनियमितता झाली असेल तर कारवाई झाली पाहिजे या मताचे आमचे सरकार आहे, असे स्पष्ट केले.पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी १८०० कोटी रुपयांची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना देण्यात आल्याचा आणि त्यातही खरेदी व्यवहारातील स्टॅम्प ड्युटी माफ करून फक्त ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हा व्यवहार झाल्याचे प्रकरण समोर आले आहे.

# पराभवानंतर आता लोकांमध्ये जाण्याची जाणीव झाली!

### उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यावर फडणवीसांचे धारदार टीकास्त्र

नागपूर : शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सध्या मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाचा दौरा करत असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सलग दुसऱ्या दिवशी त्यांच्या दौऱ्यावर जोरदार टीका केली आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कधीच 'कारपेट' सोडले नाही. आता सततच्या पराभवानंतर त्यांना लोकांमध्ये जावे लागत असल्याची जाणीव झाली आहे, असा बोचरा टोला फडणवीसांनी नागपूर येथे लगावला.

उद्धव ठाकरे यांनी मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करत, एकरी ५० हजार रुपये आणि जमीन खरवडून गेलेल्या शेतकऱ्यांना एकरी साडेतीन लाख रुपये मदतीची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे बाहेर पडले याचा मला आनंद आहे. कारण मुख्यमंत्री असताना ते कारपेटवरून खाली उतरले नाहीत. आता पराभवानंतर किमान त्यांच्या लक्षात आले की लोकांमध्ये जावे लागते.

'निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आले...'

मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाकरे यांच्या दौऱ्यामागचे कारणही स्पष्ट केले. ते म्हणाले, निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ते आलेले आहेत. सरकारचं पॅकेज लोकांच्या खात्यात पोहोचतच आहे. त्यामुळे त्यांना फारसा प्रतिसाद मिळत नाहीये. इतकंच नव्हे तर, लोकांना पकडून त्यांच्या भेटीसाठी आणले जात आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

मदत वाटपाला विलंब का? मुख्यमंत्र्यांनी दिले स्पष्टीकरण

शेतकऱ्यांना अद्याप आर्थिक मदत मिळाली नसल्याचे आरोप होत असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. त्यांनी मान्य केले की, हे खरं आहे की, काही ठिकाणी अजून पॅकेज पोहोचलेलं नाही. त्या ठिकाणच्या लोकांच्या मनात संभ्रम आहे. परंतु, आरबीआयच्या नियमानुसार रोज जास्तीत जास्त ६०० कोटी रुपयेच वितरित करता येतात. त्यामुळेच उशीर लागत आहे. मात्र, रोज याच गतीने मदत वाटप सुरू असून, आता जवळपास संपूर्ण पॅकेज शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# राज्यावर पावसाचं संकट कायम ; हवामान विभागाचा इशारा

मुंबई : एरवी सप्टेंबर - ऑक्टोबर दरम्यान पाऊस पडणे थांबते. पण यंदा नोव्हेंबर महिना आला तरी राज्यातच नाही तर देशातही ठिकठिकाणी पाऊस पडत आहे. या वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे शेतीचं आणि पशुधनाचं नुकसान झालं आहे. राज्यात आणखी किमान तीन दिवस पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

महाराष्ट्रात किमान तीन दिवस हलक्या ते माध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. हा पाऊस पडत असताना ठिकठिकाणी विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पुणे, सांगली, सातारा येथे ढगाळ वातावरण असेल. विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचीही शक्यता असल्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी. मोंथा चक्रीवादळानंतर आणखी एका वादळाचा फटका बसणार असल्याने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम असेल; असे हवामान विभागाने सांगितले.

हवामान विभागाचा इशारा

नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाल्यामुळे देशाच्या अनेक भागात पाऊस आणि वादळे येऊ शकतात. तसेच ८ नोव्हेंबर पर्यंत उत्तराखंड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

रत्नागिरी, सांगली, सातारा, अहिल्यानगर, पुणे या भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस येईल. बीड, नांदेड, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, ठाणे, रायगड, जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण असेल आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. राज्यातील इतरही जिल्ह्यांमध्ये पाऊस हजेरी लावण्याचे संकेत वर्तवले जात आहेत, यादरम्यान वेगाने वारेही वाहण्याची शक्यता आहे.

८ नोव्हेंबर पर्यंत संकेत आहे

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, सोमवारपासून सक्रिय झालेल्या पश्चिमी विक्षोभाचा उत्तर प्रदेशवर सौम्य परिणाम होऊ शकतो. बहुतेक ठिकाणी पावसाची अपेक्षा नाही. मध्य आणि पश्चिम भारतात हवामान बदल दिसून येत आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पूर्व मध्य प्रदेशात वादळ आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण आणि गोवा किनारपट्टी भागात ५ ते ६ नोव्हेंबर दरम्यान वादळ येण्याची शक्यता आहे.

# ४ महिन्यांपूर्वीच्या अपघातावरून अभियंत्यांवर गुन्हा; रेल्वे कर्मचाऱ्यांनी काम थांबवत व्यक्त केला संताप

मुंबई : मुंबईकरांसाठी आजची सायंकाळ प्रवासाच्या दृष्टीने मोठी त्रासाची ठरली आहे. मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (उडचढ) स्थानकात अचानक आंदोलन सुरू केल्याने लोकल रेल्वे सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. सायंकाळी साडेपाच वाजता मोटरमनसह रेल्वे कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन सुरू केले. त्यामुळे सायंकाळी ५ वाजून ४० मिनिटांपासून कल्याणच्या दिशेने (डाऊन लाईन) एकही रेल्वे गाडी धावलेली नाही, परिणामी सर्वच स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी वाढली आहे.

ऐन संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी हे आंदोलन सुरू झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. डाऊन दिशेने जाणाऱ्या सर्व लोकल ट्रेन्स सीएसएमटी स्थानकातच उभ्या आहेत, ज्यामुळे फलाटांवर



चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या अचानक आंदोलनामागे ४ महिन्यांपूर्वी झालेला एक अपघात कारणीभूत ठरला आहे. जून २०२५ मध्ये मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ लोकलच्या दरवाजात लटकून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची एकमेकांना धडक बसून अपघात झाला होता. यात ४ जणांचा मृत्यू झाला, तर ९ जण जखमी झाले होते.

या गंभीर अपघातानंतर, तब्बल चार महिन्यांनी लोहमार्ग पोलिसांनी रेल्वे विभागातील दोन विभागीय अभियंत्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा (उींश्रींलिश्रश केळलळवश) दाखल केला आहे. निष्काळजीपणा आणि ट्रॅक मेंटेनन्सकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका या अभियंत्यांवर ठेवण्यात आला आहे. याच कारवाईचा निषेध म्हणून मोटरमनसह रेल्वे कर्मचाऱ्यांनी काम थांबवून आंदोलन सुरू केले आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांवरील या गुन्हेगारी कारवाईमुळे त्यांच्यात तीव्र नाराजी आणि संताप पसरला आहे.

# धमक्यांना कंटाळून तरुणाची विहिरीत उडी!

छत्रपती संभाजीनगर : सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे झालेल्या सततच्या धमक्या आणि मानसिक त्रासाला कंटाळून एका २८ वर्षीय तरुणाने दुर्दैवी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घडलेली घटना अशी की, छत्रपती संभाजीनगर शहराच्या नामफलकाच्या बोर्डखाली लघुशंका करतानाचा दोन मित्रांचा एक व्हिडिओ बनवण्यात आला होता. हा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या कृत्यामुळे सामाजिक आणि धार्मिक भावना दुखावल्याने सोशल मीडियावर मोठी खळबळ उडाली. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, या तरुणांना नेटीझन्सकडून तीव्र विरोध आणि धमक्या येऊ लागल्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या तरुणांनी तत्काळ माफीनामा बनवून सोशल मीडियावर प्रसारित केला आणि माफी मागितली. परंतु, माफी मागूनही धमक्यांचा सिलसिला थांबला नाही. या सततच्या मानसिक त्रासामुळे जालन्यातील रहिवासी असलेल्या महेश आडे (वय २८) या तरुणाने टोकाचे पाऊल उचलले. धमक्यांना कंटाळून महेशने विहिरीत उडी घेत आपले जीवन संपवले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अत्यंत गंभीर घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली आहे. महेश आडेला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी, व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या आणि धमक्या देऊन मानसिक त्रास देणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे आणि ऑनलाइन बदनामीमुळे एका निष्पाप तरुणाचा जीव गेल्याने या संपूर्ण प्रकरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माफी मागूनही वाचला नाही! - छत्रपती संभाजीनगर घटनेतील तरुणावर ऑनलाइन हल्ले

सोशल मीडियाचा अतिरेक आणि ऑनलाइन बदनामी कोणत्या थराला जाऊ शकते, याचा धक्कादायक प्रत्यय जालना जिल्ह्यात आला आहे. नेटीझन्सकडून होणाऱ्या सततच्या ट्रोलिंग आणि धमक्यांना कंटाळून ढोकमळ तांडा (ता. जालना) येथील एका तरुणाने विहिरीत उडी घेऊन आपले जीवन संपवले. ही दुर्दैवी घटना एका व्हायरल व्हिडिओमुळे घडली. काही दिवसांपूर्वी दोन तरुण छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाजवळील नामफलकाच्या पिवळ्या बोर्डखाली लघुशंका करत असताना आढळून आले होते. याच वेळी तिथे उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने लघुशंका करणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ काढला आणि तो सोशल मीडियावर व्हायरल केला. प्राथमिक माहितीनुसार, लघुशंका करणारे हे दोन्ही तरुण नशेत होते. हा व्हिडिओ व्हायरल होताच सामाजिक आणि धार्मिक भावना दुखावल्याच्या प्रतिक्रिया उमटल्या आणि या तरुणांवर तीव्र टीका सुरू झाली. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून दुसऱ्याच दिवशी या दोन्ही तरुणांनी माफीचा व्हिडिओ बनवून प्रसारित केला. त्यांनी आपल्या कृत्याबद्दल खेद व्यक्त करत जाहीर माफी मागितली होती. परंतु, ही माफी काही कामाची ठरली नाही. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तरुणाला सातत्याने अज्ञात लोकांकडून धमक्या आणि मानसिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून अखेर तरुणाने टोकाचे पाऊल उचलले आणि आत्महत्या केली. या घटनेनंतर तरुणाच्या कुटुंबीय आणि नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त करत आष्टी पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांवर आणि सातत्याने धमक्या देऊन आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, सोशल मीडियाच्या गैरवापराने एका तरुणाचा जीव घेतल्याबद्दल गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. व्हिडिओ आणि ऑनलाइन बदनामी थांबवण्यासाठी सायबर कायद्यातील तरतुदींबद्दल तुम्हाला माहिती हवी आहे का?

ऑनलाइन 'ट्रॉमा'चा बळी! धमक्यांना कंटाळलेल्या तरुणाची आत्महत्या

सोशल मीडियावर होणारे अखंड ट्रोलिंग आणि जीवे मारण्याच्या धमक्या किती भयानक असू शकतात, याचा प्रत्यय देणारी एक हृदयद्रावक घटना जालना जिल्ह्यातील ढोकमळ तांडा येथे घडली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील नामफलकाजवळ अश्लील कृत्य करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, माफी मागूनही नेटीझन्सकडून या तरुणांना सतत मानसिक त्रास दिला जात होता. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतरही अनेक इन्स्टाग्राम अकाऊंट्सवरून या तरुणांचे व्हिडिओ वारंवार शेअर केले जात होते. परिणामी, २८ वर्षीय महेश आडे या तरुणाला आणि त्याच्या मित्राला रोज धमकीचे मेसेज आणि फोन कॉल्स येत होते. सततच्या या त्रासाला कंटाळलेला महेश आडे पूर्णपणे मानसिकरित्या खचला होता. हे सगळं आता मला सहन होत नाहीये, त्यामुळे मी आत्महत्या करीन, असे तो अनेकदा आपल्या मित्रांजवळ बोलूनही दाखवत होता. अखेरीस, ऑनलाइन छळवणुकीचा हा ताण असह्य झाल्यामुळे, महेश आडेने विहिरीत उडी घेऊन आपले जीवन संपवले.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतर्गत धिनस्त जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने व जिल्हा राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने दिनांक ०१ ते ०२ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत १७ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न झाला.

सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद, बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांचे हस्ते, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर, जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव शकील अहेमद, गोपाळ धांडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना सातत्याने खेळाचा सराव करून विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केले पाहीजे. खेळ खेळल्याने शरीर व मन तंदुरूस्त राहत. ज्या संघानी प्राविण्य मिळविले त्या संघातील खेळाडूंचे कौतूक करून खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य मिळवून राज्याचे नाव उंचवावे अशी अपेक्षा व्यक्त केले. जे संघ पराभूत झाले, ज्या खेळाडूंची राज्य संघात निवड झाली नाही त्यांनी नाराज न होता खचून न जाता पुढच्या वेळेस जोमाने खेळ करत यश संपादन करावे असे प्रतिपादन केले.

सदर स्पर्धेत मुलांच्या वयोगटात प्रथम क्रमांक छत्रपती संभाजीनगर विभाग (विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काळेगाव हवेली, ता. जि. बीड, द्वितीय क्रमांक कोल्हापूर विभाग (माध्यमिक आश्रमशाळा आष्टा, जि. सांगली तर तृत्तीय क्रमांक – नागपूर विभाग निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागपूर, जि.नागपूर सदर स्पर्धेत मुलींच्या वयोगटात प्रथम क्रमांक पुणे विभाग (मिलेनियम नॅशनल स्कुल ॲण्ड जुनियर कॉलेज जि. पुणे), द्वितीय क्रमांक –लातूर विभाग (छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव, जि. धाराशिव तर तृत्तीय क्रमांक कोल्हापूर विभाग (द्रविड हायस्कुल, वाई, ता. वाई, जि. सातारा) जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर यांनी प्रास्तविकामध्ये सदर स्पर्धे विषयी सविस्तर माहिती देवून सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात मान्यवर मंडळी उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद व्यक्त करून आभार मानले .

सदर स्पर्धा हया दोन दिवस चालू राहिल्या. सदर स्पर्धेत राज्याच्या आठ विभागातून आठ मुले व आठ मुलींचे संघ, प्रत्येक विभागातून ०५ मुले व ०५ मुली निवड चाचणीसाठी सहभागी झाले. सदर स्पर्धेतून क्रीडा

संचालनालयामार्फत नियुक्त तज्ञ निवड समिती सदस्यांमार्फत महाराष्ट्र राज्याचा मुला व मुलींचा पुढील प्रमाणे–निवडण्यात आला. सदर संघ उत्तरप्रदेश बरेली येथे दि. ११ ते १५ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत होणा–या राष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे.सदर स्पर्धेकरिता राज्य संघ निवड चाचणी सदस्य म्हणून नाजुक उईक, गणेश खैरमोडे, अनिकेत बोडखे, धनंजय माळी, अंजली पाटील, पंच म्हणून जब्बार पठाण, काझी अकरम, सुनिल मुलानी, ताज पठाण, शहाबाज पठाण, विठ्ठल कावरे, प्रशांत सिरसाठ, वहिद शेख, प्रविण कोरडे हे काम पाहत आहेत.निवडलेला महाराष्ट्र राज्याचा मुलींचा संघ गायत्री नांदे, सई जगताप, शृती राऊत, स्वरा देवघरे, सिद्धी सनस,विशाखा, मोरे, वैष्णवी पाटील, प्रणाली कामटकर, माहेश्वरी भावरकर, मधुरा देसाई, उर्वी दसरे, वैष्णवी भनजे. राखीव खेळाडू संध्या कानवटे, गिरीजा पवार, सानवी कोळी, वसुधा नांदुर्डीकर, रिशमा शेट्टी.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा

## बीडमध्ये ८ उपकेंद्रावर २०४० परीक्षार्थी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण ०८ उपकेंद्रामधून सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० व दुपारी दुसरे सत्र ०३ ते ०५.०० वाजता अशी दोन सत्रात घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण २ हजार ४० उमेदवार बसलेले आहेत.

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ०८ उपकेंद्रप्रमुख १६ मदतनीस ३२ पर्यवेक्षक १०३ समवेक्षक असे एकूण १५९ अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक ०४ नोव्हेबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

१०० मीटर परिघात मनाई आदेश परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मध्यल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत दोन सत्रासाठी दोन छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांच्या परीक्षा उपकेंद्रावर पेपर क्रमांक –०१ सकाळी ०८.३० वाजता व पेपर क्रमांक ०२ सत्रामध्ये दुपारी १.३० वाजता उपस्थित राहावे.

सकाळच्या सत्रात ०९.३० वाजेनंतर आणि दुपारच्या सत्रात २.३० वाजेनंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# श्री क्षेत्र गौतमऋषी देवस्थानास धाकट्या ब्रह्मगिरीचे महात्म्य!

## काकडा सांगता निमित्त महापंगत संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

बीड शहरापासून पालवन श्री क्षेत्र गौतमऋषी संस्थान घोलपदरा पालवन येथे

ह.भ.प.श्री.गु.महंत श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या मार्गदर्शना आयोजित काकडा सांगता निमित्ताने ह.भ.प.श्री. रामायणाचार्य विश्वंभर महाराज माळोदे यांच्या सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले असुन या निमित्ताने राजेंद्र मस्के परिवारातर्फे महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील अनेक भाविक भक्तांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री. क्षेत्र गौतमऋषी देवस्थान जिल्ह्यात भाविक भक्तांच्या श्रद्धेमुळे विख्यात झाले असून दर अमावस्येला भाविक भक्तांची दर्शनासाठी गर्दी असते. या देवस्थानवर येणाऱ्या भाविक भक्तांच्या सोयीसाठी रस्ता, नाल्या, लाईट, पाणी अशा मुलभूत

पालवण ग्रामस्थ व राष्ट्रवादी शरदपवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने

सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. संक्रांति दरम्यान त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी अलोट गर्दी असते. त्याच धर्तीवर बीड व पंचक्रोशीतल भाविकांची प्रदक्षिणेसाठी गर्दी होते. गेली अनेक वर्षापासून प्रदक्षिणेची परंपरा भक्तांनी संवर्धित केली आहे.महर्षी गौतम ऋषीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या प्राचीन तपोभूमीत संत महंत ऋषी मुनींच्या कृपा आशीर्वादाने भाविक भक्तांच्या विशेष परिश्रमातून श्री त्र्यंबकेश्वर महादेव व श्री रुक्मिणी पांडुरंगाचे भव्य नतून मंदिराचे व शिखराचे बांधकाम करण्यात आले आहे.तसेच या संस्थानात

श्री रुक्मिणी पांडुरंग, जगद्गुरु तुकाराम महाराज महंत गुरु महादेव बाबा यांच्या नतुन मूर्तीची स्थापना यापूर्वीच करण्यात आलेल्या आहेत. यामुळे परिसरातील भाविक बहुसंख्येने या गौतम ऋषी देवस्थान मध्ये दर्शनासाठी व आध्यात्मिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

चातुर्मासाच्या निमित्ताने आज काकडा सांगता समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# किल्ले धारूर नगरपरिषद निवडणूक २०२५: 'वारसा' आणि 'तरुण जोश' घेऊन डॉ. मयूर सावंत रिंगणात!

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.६ नोव्हेंबर**

किल्ले धारूर नगरपरिषदेच्या आगामी २०२५ च्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाकडून तरुण आणि सुशिक्षित चेहरा डॉ. मयूर मुकुंदराव सावंत यांनी जोरदार दावेदारी केली आहे. 'एकच ध्यास, किल्ले धारूरचा सर्वांगीण विकास' हे लक्ष घेऊन ते मैदानात

### ध्येय 'सर्वांगीण विकासाचे'; राष्ट्रवादीकडून नगराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदारी

उतरण्यास सज्ज झाले असून, त्यांच्या उमेदवारीमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.



डॉ. मयूर सावंत यांचा राजकीय वारसा पिढीजात आहे. त्यांचे वडील, प्राध्यापक मुकुंद सावंत यांनी कमी वयात राजकारणात सक्रिय होत नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद भूषवले होते. त्यांच्या कार्यकाळात धारूर शहराला पाणीटंचाईतून बाहेर काढण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासारखी अनेक महत्त्वाची विकासकामे केल्याचे बोलले जाते.

याचबरोबर, डॉ. मयूर यांचे आजोबा, फकिरा सावंत यांनी देखील 'मठ गल्ली, कसबा विभाग' मधून नगरसेवक म्हणून नगरपरिषदेत काम केले आहे. आजोबा आणि वडिलांनी केलेल्या सामाजिक आणि राजकीय कामाची प्रेरणा घेऊनच डॉ. मयूर सावंत हे आता सक्रिय राजकारणात उतरले आहेत. तरुण नेतृत्व, विकासाचा निर्धार सध्या चर्चेत असलेले डॉ. मयूर सावंत हे तरुण असल्याने त्यांच्यामध्ये असलेला उत्स्फूर्त उत्साह, सकारात्मक कार्यशैली आणि सामाजिक एकोपा राखण्याची वृत्ती शहरातील नागरिकांमध्ये विशेषतः युवकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

प्रत्येक सामाजिक कार्यक्रमात त्यांची सक्रिय उपस्थिती असते. त्यांच्या तरुण नेतृत्वाला शहरातील युवकांची मोठी पसंती मिळत आहे.

प्राध्यापक मुकुंदराव सावंत यांचा राजकीय वारसा आणि स्वतःचा तरुणाईचा जोश यामुळे नगराध्यक्षपदासाठी ते किल्ले धारूर शहरात प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जात आहेत. 'लक्ष २०२५' – तिकीटासाठी सर्वत्र मागणी

राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून नगराध्यक्षपदाचे तिकीट मिळावे यासाठी डॉ. मयूर सावंत यांनी पक्षाकडे मागणी केली आहे. त्यांचे कौटुंबिक राजकीय योगदान, शैक्षणिक पार्श्वभूमी आणि धारूरच्या विकासाची तळमळ पाहता, त्यांना उमेदवारी मिळावी अशी भावना विविध क्षेत्रांतील नागरिक व्यक्त करत आहेत.

डॉ. मयूर सावंत यांच्या रूपाने किल्ले धारूर शहराला एका गतिमान आणि विकासाभिमुख तरुण नेतृत्वाची संधी मिळू शकते, असे मत व्यक्त होत आहे. 'लक्ष २०२५' साध्य करण्यासाठी, ही उमेदवारी मिळाल्यास ते नक्कीच वडिलांच्या आणि आजोबांच्या पावलावर पाऊल ठेवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करतील अशी आशा आहे.

# मनोज जरांगे प्रकरणी ना. पंकजाताई मुंडे यांची जालन्याच्या एसपींशी चर्चा; प्रकरणाचा गंभीरपणे तपास करून जरांगेंच्या सुरक्षेत वाढ करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.६ नोव्हेंबर**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या जीवाला धोका असल्याच्या बातम्या माध्यमात आल्यानंतर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालन्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जालन्याचे पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना संपर्क साधून या विषयावर चर्चा केली. या प्रकरणाचा गंभीरपणे तपास करून जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करावी असे आदेश आज दिले.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या जीवाला धोका असल्याची तक्रार पोलिस ठाण्यात आल्यानंतर जालना पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेत त्यांची चौकशी सुरू केली आहे. या घटनेची माहिती मिळताच जालन्याच्या पालकमंत्री म्हणून ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेचच पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना फोनवरून संपर्क साधला आणि संपूर्ण घटनेची माहिती जाणून घेतली. हा प्रकार अतिशय गंभीर असून याचा सखोल तपास करावा तसेच जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करावी असे आदेश त्यांनी पोलिस अधीक्षकांना दिले.

# मुकुंदराज व मुरंबी तलाव परिसरात विविध प्रजातीच्या पक्ष्यांची नोंद

**पक्षी निरीक्षणासाठी गर्दी**

**तभा वृत्तसेवा**
**अंबााजोगाई दि.६ नोव्हेंबर**

संपूर्ण महाराष्ट्रात ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या काळात महाराष्ट्रभर पक्षी सप्ताह साजरा केला जातो. यानिमित्त बुधवारी (दि. ०५) शहरातील पक्षी मित्रांनी मुकुंदराज, नागनाथ व बुट्टेनाथ मंदीर परिसरात तर गुरुवारी (दि. ०६) रोजी मुरंबी तलावावर पक्षांची पाहणी केली. यावेळी विविध पक्षांच्या प्रजाती आढळून आल्या त्यांची नोंद इ–बर्ड या प वर करण्यात आली.

पक्षीशास्त्रज्ञ मारूती चितमपल्ली (५ नोव्हेंबर आणि डॉ. सलीम अली (१२ नोव्हेंबर) यांच्या जन्मदिनाच्या मधल्या काळात हा पक्षीसप्ताह पक्षी मित्र महाराष्ट्रभर राबवितात. अंबाजोगाई शहरात दरवर्षी प्रमाणे या वर्षीही हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात दिनांक ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेबर या काळात विविध ठिकाणी पक्षिनिरीक्षणांचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षीसप्ताहाच्या पहिल्या दिवशी सुरुवात करताना मुकुंदराज परिसर ते बुटेनाथ – नागनाथ मंदिर या ठिकाणी पक्षीनिरीक्षण करण्यात आले. सकाळी ६.३० ते ९ या वेळात पक्षिनिरीक्षणाने या उपक्रमाची सुरुवात झाली. गुरुवारी तालुक्यातील मुरंबी तलावावर पक्षी निरीक्षणासाठी अंबाजोगाई येथील अनेक निसर्गप्रेमी नागरिक पक्षिअभ्यासक, शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. या पक्षिनिरीक्षणावेळी मुकुंदराज परिसरात अनेक प्रजातींचे पक्षी आढळून आले. यातील काही पक्षी हे स्थलांतरीत आणि इतर स्थानिक प्रकारचे पक्षी होते. अंबाजोगाई येथील अनेक पक्षीमित्रांनी उपस्थितांना पक्षी निरीक्षणासाठी मार्गदर्शन केले. डॉ. शुभदा लोहिया, प्रा. अभिजित लोहिया, रत्नाकर निकम, रामराव मुंडे, जे. व्ही. कस्तुरे, मुन्ना सोमाणी, स्वाराती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत देशमुख, गणेश कदम, हेमंत धानोरकर, प्रा. आदित्य कदम, प्रा. पी. एस. तरकसे, श्रीराम वाशिंबे, प्रशांत बर्दापुरकर, शुभम देशमाने, शंकर कराड या सर्वांनी पक्षिनिरीक्षणात सहभाग घेतला. तसेच आदित्य कदम, ओजस तारका हेमंत, वरद देशमुख या बाल पक्षीनिरीक्षकांनीही या उपक्रमात अत्यंत उत्साहाने सहभाग घेऊन पक्षीशास्त्रातील विज्ञान व मनोरंजन याचा अनुभव घेतला.

निरीक्षणात आढळलेले पक्षी

मुकुंदराज परिसर ते बुटेनाथ –नागनाथ मंदिर परीसरात बोनेलीचा गरुड, हळद्या, चष्मेवाला, वेडा राघू, निलीमा, शेकाट्या, रिव्हर टर्न, कॉमन सँडपाइपर, ग्रे हेरॉन, डार्टर, पांढरी पाणकोंबडी, पान कावळे, नदी कुरव, हळदी कुंकू बदक, अशा अनेक वैशिष्ट्यपुर्ण पक्ष्यांचे प्रकार मोठ्या प्रमाणात आढळून आले.

# सेवा निवृत्त कर्मचारी यांनी हयात नामे सादर करावेत–अनिल बोर्डे



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील सर्व पेन्शन धारक व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी दरवर्षीप्रमाणे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे असे श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई यांनी केले आहे.

जिल्हा परिषद कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे व कोषागार अधिकाऱ्याकडून पेन्शन मिळणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी बँक ऑफ इंडिया बँकेत हयात नामा प्रमाणपत्र सादर करावे. हयात नामा प्रमाणपत्र सोबत आधार कार्ड, बँक अकाउंट, पी पी पी ओ क्रमांक असणे आवश्यक आहे असे आवाहन सेवानिवृत्त व अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई अनिल बोर्डे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७

जा.क्र. दीन/मु.का./वसुली/०९/७००२-११८/१७३/२०२५-२६ दिनांक- ०४.११.२०२५

परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार
**मालमत्ता विक्रीची सुचना**
विक्री नोटीस (अचल मालमत्ता)

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही **१.कर्जदार** मे. लक्ष्मीरमण किराणा स्टोअर्स प्रोप्रा. पवार समाधान रावसाहेब (कर्जदार) **पत्ता:-** कन्हेरी रोड, लातुर,ता.जि.लातुर ४१३ ५१२ **२.सह-कर्जदार** श्रीमती छाया रावसाहेब पवार **पत्ता:-** म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, आरटीओ ऑफीस, ता.जि. लातुर ४१३ ५१२ **३.जामीनदार** श्री. विकास हरिबा मोठेराव **पत्ता:-** हरिबा मोठेराव, अण्णासाहेब साठे नगर, चाकुर,जि.लातुर ४१३ ५१३ **४.जामीनदार** श्री. गौतम मुकुंद जाधव **पत्ता:-** मु.पो. चाकुर, ता.जि. लातुर ४१३ ५१३

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **३१.०५.२०२१** रोजी दस्त क्रं.२८५८/२०२१ रु.८,५०,०००/-(अक्षरी रु.:- आठ लाख पन्नास हजार रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत मालमत्तेचा ताबा दिनांक ०८.०५.२०२५ रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांर्तगत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३१.१०.२०२५** रोजी थकीत रक्कम **रु.१०,२०,७७१/-(अक्षरी रु.दहा लाख विस हजार सातशे एकाहत्तर रु.)** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-लातुर या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **लातुर** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक ०६.१२.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**
**(मालमत्ता मालकाचे नाव- छाया रावसाहेब पवार)**
पवार छाया रावसाहेब यांच्या मालकीची महाराणा प्रताप नगर, बाभळगाव रोड, आर.टी.ओ. कार्यालय, लातुर प्लॉट क्र.०७ (दक्षिणेकडील भाग) सर्व्हे नं.९८/१, ग्रा.प.मा.क्र.५६८५ पुर्व-पश्चिम- ३१ फु., दक्षिण-उत्तर-२२.६० फु. क्षेत्र- ७००.००चौ.फु.(६५.०५स्वे.मी.) त्यावरील बांधकामासह त्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व-** २० फु. रस्ता
**पश्चिम-** माणिकराव चोथवे यांची जागा
**दक्षिण-** प्लॉट क्र.०६
**उत्तर-** सदर प्लॉट नं.०७ चा भाग काशीबाई गायकवाड यांचा
("वरील मालमत्ता जशी आहे तशी आहे त्या स्थितीत")

**१.मालमत्ता राखीव किंमत रु.५,४४,०००/-(अक्षरी रु.: पाच लाख चवरेचाळीस हजार रु फक्त)**

**२.अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रु.:-**पाच हजार फक्त).

**विक्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त) नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-लातुर शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**लातुर** येथे दिनांक ०६.१२.२०२५ सायं.०५.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राखी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक १०.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता बँकेच्या शाखा-लातुर येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
७. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे.
९. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय,जालना वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ७६६६५७७९९०० पत्ता शाखा-लातुर मो.क्र.९०४९९९८२७१ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
१०. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
११. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

स्थळ:- लातुर
दिनांक:-०४.११.२०२५

अधिकृत अधिकारी,
(सिक्युअर्ड क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मो. ७६६६५७७९९००

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

( Secured Creditor as defined u/s 2(1)(zd) of SARFAESI Act,2002)

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/१३/टीएल-८०/१७३/२०२५-२६ दिनांक ०४.११.२०२५

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. मे. राजछाया इन्फ्रा प्रोप्रा. सौरभ युवराज दहिवाळ (कर्जदार)
पत्ता:-सहयोग मंगल कार्यालया जवळ,जागृती कॉलनी, वसमत रोड,परभणी, ता.जि.परभणी-४३१ ४०१
२. श्रीमती छाया युवराज दहिवाळ (सहकर्जदार)
पत्ता:-सहयोग मंगल कार्यालया जवळ,जागृती कॉलनी,वसमत रोड,परभणी, ता.जि. परभणी-४३१ ४०१
३. श्री. मोतीलाल कपुरचंद जैन,
पत्ता:- महाराणी लक्ष्मीबाई रोड,चंदनदीप, नवीन मोंढा, परभणी, ता.जि. परभणी-४३१ ४०१
४. श्री. बापुराव संतराम टाक
पत्ता:- संत गाडगे बाबा नगर, वसमत रोड, परभणी, ता.जि. परभणी-४३१ ४०१

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:-**परभणी**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक **१८.०४.२०२५** पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. टीएल-८० रु.८०,००,०००/- | **(मालमत्ता धारक-** सौरभ युवराज दहिवाळ व छाया युवराज दहिवाळ) **१.** मौजे खानापुर ता.जि.परभणी येथील मालमत्ता पुर्वेकडील भागातील प्लॉट क्र.०२, सर्वे क्र.२५, गट क्र.८१,ब्लॉक क्र.(अ).एम.सी.घर क्र. २५/ब्लॉक/अ/२) वार्ड क्र.१९ क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम (Southern Side): 4.85 Mtr., East-West: (Northern Side):5.00Mtr. **आणि** South-North:20.30Mtr., Total Area 99.977 Sq. Mtr., **खुला प्लॉट ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:-** प्लॉट क्र.०३ **पश्चिम:-** प्लॉट क्र.०२ चा डॉ. अमोल मेटे यांनी खरेदी केलेला भाग **दक्षिण:-** १५ मी. कारेगाव रोड **उत्तर:-** प्लॉट क्र.१३ **("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")** २. मौजे खानापुर, ता.जि.परभणी येथील मालमत्ता प्लॉट क्र.०३ सर्वे क्र.२५,गट क्र. ८१ एम.सी. घर क्र.२५/ब्लॉक/अ/३, वार्ड क्र.१९ क्षेत्रफळ East-West: (Northern Side):13.00 Mtr. East-West: (Southern Side): 16.00 Mtr. And south-North (Eastern Side): 23.00Mtr., South-North (Western Side): 21.00Mtr., Total area 319.00 Sq.Mtr., खुला प्लॉट ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- **पुर्व:-**७.५० मी मधील रस्ता **पश्चिम:-** प्लॉट क्र.०२ **दक्षिण:-**१५मी.कारेगाव रोड **उत्तर:-** प्लॉट क्र.१३ **("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")** | मुद्दल + व्याज एकुण रु.६५,६३,६२०/- दिनांक ३१.१०.२०२५ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.११.२०२५ पासुन |

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

| | | |
|---|---|---|
| | **(मालमत्ता धारक-** छाया युवराज दहिवाळ) **मौजे कारेगाव ता.जि.परभणी येथिल सर्वे क्र.२३ गट क्र.७३ एकुण क्षेत्रफळ ९० आर मधील फ्लॅट्स अ) फ्लॅट क्र.१०६ विष्णु अपार्टमेट, पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ ८७४ स्वे.फु. ज्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:-** फ्लॅट क्र.१०७ **पश्चिम:-**फ्लॅट क्र.१०५ **दक्षिण:-** पॅसेज रस्ता **उत्तर:-** रस्ता **("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत") ब) फ्लॅट क्र.११५ ब्रम्हा अपार्टमेट, पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ सुपर बिल्टप क्षेत्र ५७७.६ स्वे.फु. ज्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:-** रस्ता **पश्चिम:-** पॅसेज रस्ता **दक्षिण:-** रस्ता **उत्तर:-** फ्लॅट **("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")** | |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **१५.०७.२०२२**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **०१.०७.२०२२ (गहाणखत नोंदणी क्र.५४३८/२०२२)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.६५,६३,६२०/- दिनांक ३१.१०.२०२५ अधिक दिनांक ०१.११.२०२५ पासुन पुढील व्याज @११.८५%** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक ०५.०१.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

ठिकाण:- अंबाजोगाई

श्री.अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अमेरिकन टुरिस्टरची नवीन मोहीम सुरू

नाशिक - मेड इन नाशिक. फॉर द वर्ल्ड ही त्यांची नवीन मोहीम सुरू केली आहे, हा चित्रपट ब्रँडच्या जागतिक प्रवासामागील शहराचे वर्णन करतो. ब्रॅण्डची जगातील सर्वात मोठी फॅक्टरी असलेल्या नाशिकमध्ये, कारागिरी आणि कौशल्य जिवंत आहे. ही मोहीम म्हणजे अमेरिकन टुरिस्टरच्या जागतिक प्रवासाला आयकॉन म्हणून बळ देणाऱ्या अभिमानाला, व्याप्तीला आणि लोकांना दिलेली आदरांजली आहे.नाशिक प्लांटमधील कामगारांच्या दृष्टिकोनातून चित्रित केलेला हा टीव्हीसी - जिथे हस्तकलेच्या निर्मितीतील अचूकता, नाशिकच्या चैतन्यशील कला आणि संस्कृतीमध्ये अखंडपणे मिसळते - नदीकाठापासून बाजारांपर्यंत, ढोलाच्या तालापासून पैठणीच्या सौंदर्यापर्यंत - ही मोहीम प्रत्येक तपशीलात नाशिकचे मनोगत टिपते. या कथेत शहरातील कारागिरीची खोलवर रुजलेली परंपरा दररोज फॅक्टरीतून कशी पसरते हे दाखवले आहे, जी ब्रँडला पुढे नेणाऱ्या लोकांच्या चिकाटीने साकारली आहे.

## सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी'ने धाडसी नवीन दृष्टिकोनासह केली प्रेमाची नवी व्याख्या

टेलिव्हिजनवरील नेहमी बलिदान देणाऱ्या त्याग-मूर्ती स्त्रियांच्या चित्रणाला धक्का देत सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेने अन्विता (सुंबुल तौकीर खान) ही व्यक्तिरेखा सादर केली आहे, जी रूढींना आव्हान देण्याची हिंमत करते. एरवी टेलिव्हिजनवरील स्त्रिया निःस्वार्थी आणि आपल्या प्रियजनांसाठी कोणतेही दुःख सोसण्यास तयार असतात पण अन्वितासमोर जेव्हा कठीण पर्याय निवडण्याची वेळ येते, तेव्हा ती धाडसी निर्णय घेते.आपल्या प्रियजनांच्या बचावासाठी कोणत्याही थराला जाणाऱ्या साचेबंद टेलिव्हिजन नायिकांपेक्षा वेगळी असलेली अन्विता आधी स्वतःचा विचार करताना दिसते, अगदी स्वतःच्या कुटुंबापेक्षाही. तिचा निर्णय उदासीनतेमधून आलेला नाही, तर आपल्या भावंडांसाठी स्वतःच्या हिताचे रक्षण करण्याच्या जबाबदारीतून आला आहे.

## 'बाई तुझ्यापायी' स्त्रियांच्या सन्मानार्थ खास वॉल म्युरल सादर

छत्रपती संभाजीनगर : नवी मराठी सीरीज बाई तुझ्यापायी मुळे घडून येत असलेला बदल साजरा करण्यासाठी मराठी झी५ ने विचारांना चालना देणारे एक म्युरल मुंबईच्या मध्यवर्ती भागात वसवले आहे. ही सीरीज धाडस, व्यवस्थेविरोधात आवाज उठवणे आणि क्रांती घडवणे अशा संकल्पनांवर आधारित असून त्याला आदरांजली वाहण्यासाठी हे म्युरल उभारण्यात आले आहे. ही आकर्षक कलाकृती सीरीजची भावना मांडणारी आहे - या सीरीजमधे एक तरुण मुलगी फळ्यापुढे उभी राहून मुलं - २०, मुली - १ असं वाचताना दिसते. हा प्रसंग देशभरातील शाळांमधे दिसून येणाऱ्या लिंगभेदाची आठवण करून देणारा आहे. तिच्याजवळच अहिल्या आणि तिची आई लक्ष्मी यांची प्रतिमा दिसते - प्रेम, जिद्द आणि चिकाटीनं जोडल्या गेलेल्या दोन स्त्रिया समाजानं घालून दिलेल्या मर्यादा पार करून स्वप्नं पाहाण्याचं धाडस करत असतात. हे म्युरल बाई तुझ्यापायी या सीरीजच्या संकल्पनेला आदरांजली वाहणारं आहे - ही कथा प्रेक्षकांना विचार करण्याची, मागे वळून पाहण्याची आणि स्त्रियांसाठी छोटंसं स्वप्नही खूपदा का इतकं अवघड असतं असा विचार करायला लावणारी आहे.

## सोनूलाल सुरडकर यांचे निधन



सोयगाव,दि.६ नोव्हेंबर : तालुक्यातील गलवाडा (अ) येथील रहिवासी सोनूलाल येडू सुरडकर (वय.७०) यांचे सकाळी आठ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांच्यावर गलवाडा (अ) येथील त्यांच्या शेतामध्ये सायंकाळी चार वाजून तीस मिनिटांनी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे,असा पारीवार होत.ते पत्रकार ईश्वर इंगळे यांचे मावसा तर होमगार्ड प्रशांत सुरडकर(सुरवाडे),होमगार्ड रवींद्र सुरडकर (सुरवाडे) यांचे ते वडील होत.

# १३.३३ कोटींचे कुऊबा समितीच्या विकास कामाचे भूमिपूजन

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.६, येथील कृषी उत्पन्न बाजार समिती च्या आवारात जवळपास १३ कोटी ३३ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले. भूमिपूजन झालेले काम तातडीने सुरू करण्यासह काम गुणवत्ता पूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड मार्केट कमिटीच्या विविध विकास कामांसाठी १३ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, कृउबा समितीचे



सभापती विश्वास पा. दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, संचालक नंदकिशोर सहारे, दामूअण्णा गव्हाणे, सतीश ताठे, रमेश लाठी, शेख जावेद, जयराम चिंचपुरे तसेच किशोर अग्रवाल, राजेंद्र ठोंबरे, सुदर्शन अग्रवाल, पांडुरंग जैवळ, सुखदेव जाधव, हनिफ मुलतानी, ज्ञानेश्वर जाधव, रमेश कासलीवाल, सतीश गौर, विलास शिंदे, सत्यनारायण गट्टानी, विजय पवार, मोसीन देशमुख आदिंसह आवारातील व्यापारी, शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

## बादशहा परळकर यांचे जोरदार शक्तिप्रदर्शन

पैठण दि ०६ : पैठण नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रभाग क्रमांक ५ (ओबीसी महीला) साठी सोमनाथ उर्फ बादशहा परळकर यांनी आपल्या सौभाग्यवती संगीता यांना नगरसेवक पदासाठी शिवसेना शिंदे पक्षाकडून दावेदारी सादर केली आहे. बादशहा यांच्या उमेदवारीच्या चर्चेमुळे प्रभाग क्रमांक ५ मधील मतदाराचा पाठींबा मिळत आसल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या ३० वर्षांपासून खा. संदिपान भुमरे, पैठणचे आमदार विलासबाप्पु भुमरे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक आणि स्थानिक प्रश्नांवर सक्रियपणे काम करण्याचा अनुभव असुन गेल्या पंचवार्षिक मधे याच प्रभागातुन बादशहा हे चागल्या



मताने निवडुन आले होते. या काळात वार्डातील विकास कामे करत सामाजिक, शैक्षणिक कामे ही केली असुन उच्च शिक्षित मतदारानचा पुन्हा आपल्यालाच कौल मिळणार आसल्याने विकास हा ध्येय, जनसेवा हीच दिशा हे ब्रीदवाक्य घेऊन बादशाह ना आ. विलास भुमरे यांनी उमेदवारी देऊन एक चांगला आणि स्थानिक उमेदवार प्रभागात उभा करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## मृत्यू पावलेल्या शेतकरी कुटुंबाच्या वारसांना आ.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते चार लाखांचा धनादेश

फर्दापूर दि ६ : नांदा तांडा ता. सोयगाव येथील शेतकरी कन्हीराम तुळशीराम राठोड यांचा विज पडून मृत्यू झाला होता. बुधवार ( दि.५ ) रोजी नांदा तांडा येथे आमदार अब्दुल सतार यांच्याहस्ते कन्हीराम राठोड यांचे वारसदार संगीताबाई कन्हीराम राठोड यांना चार लाख रुपयांच्या शासकीय मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

शेतकरी कन्हीराम तुळशीराम राठोड यांचा वीज पडून मृत्यू झाला होता. त्यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी नांदा तांडा येथे सांत्वन भेट देवून राठोड परिवाराची भेट घेऊन शोक व्यक्त केला होता.



राठोड परिवारास लवकरात लवकर शासकीय मदत मिळवून देऊ अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली होती. आमदार अब्दुल सत्तार यांनी याबाबत पाठपुरावा करून राठोड परिवारास ४ लाख रुपयांची शासकीय मदत मिळवून दिली.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दारासिंग चव्हाण ,माजी जि प सदस्य गोपीचंद जाधव ,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण ,शहर प्रमुख संतोष बोडखे, सयाजीराव वाघ, गणेश धोरमारे यांच्यासह हमराज जाधव, प्रकाश राठोड, कुणाल राजपूत तसेच तलाठी आकाश पिराने आदी उपस्थित होते.

## एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात 'आशाछाया' कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील टयूलीप ब्रेस्ट सेंटर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सामाजिक आरोग्य व्यवस्थेचा अविभाज्य घटक असलेल्या 'आशा'कार्यकर्तींसाठी ब्रेस्ट कॅन्सर या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा शनिवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता फार्मसी हॉल, द्योतन सभागृहाच्या खाली, एमजीएम रुग्णालय येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती एमजीएम टयूलीप ब्रेस्ट सेंटरच्या संस्थापिका डॉ.अरुणा कराड यांनी दिली. या उद्घाटन सोहळ्यास टाटा हॉस्पिटलचे माजी संचालक पद्मश्री डॉ.राजेंद्र बडवे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी. एम. जाधव, टाटा हॉस्पिटलचे माजी शैक्षणिक संचालक डॉ.कैलाश शर्मा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.धानोरकर, उपाधिकारी डॉ.सवरगावकर, एमजीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ७४३/२०२५

अर्जदार :- १. मोहीनी भ्र. अविनाश मुंजाळ, वय ३९ वर्षे, गृहीणी, रा. मुकुंदवाडी, ता. मंसापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. खडकनारळा, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, २. सुमित पि. अविनाश मुजाळ, वय १३ वर्षे, अज्ञान अ.पा.क. अर्जदार क. १ मोहीनी अविनाश मुजाळ, ३. संतोश्री पि. अविनाश मुजाळ, वय १६ वर्षे, अज्ञान अ.पा.क. अर्जदार क. १ मोहीनी अविनाश मुजाळ, ४. शोभाबाई भ्र. माधवराव उर्फ महादु मुजाळ, वय ६० वर्षे, धंदा घरकाम रा. वरील प्रमाणे.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस.के.नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ व ३ यांची आई असुन अर्जदार क. ४ ही अर्जदार क. १ ची सासु आहे. अर्जदार क. १ चे पती व अजदार क. २ व ३ यांचे वडील नामे अविनाश पि. माधवराव उर्फ महादु मुजाळ दिनांक १२/०६/२०२४ रोजी घाटी दवाखाना छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत अविनाश यांचे वडील नामे माधवराव उर्फ महादु मुजळ हे २८/०६/२००४ रोजी मयत झालेले आहे. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक ६/लि/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क. ७५०/२०२५

अर्जदार : १) शिवाजी मारूती ईष्टके वय ६० वर्ष धंदा शेती रा. कायगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) विठठल मारूती ईष्टके वय ५६ वर्ष धंदा शेती रा. बजाजनगर वाळूज जि. छत्रपती संभाजीनगर ३) सुमनबाई गंगाधर औताडे वय ७८ वर्ष धंदा घरकाम रा. बाभूळखेडे ता. नेवासा, जि. अहिल्यानगर४) विमल अनिल कान्हे वय ७५ वर्ष धंदा घरकाम रा. कायगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर५) पांडूरंग मारूती ईष्टके मयत यांचे वारस खालील प्रमाणे अ. निर्मला पांडूरंग ईष्टके वय ५४ वर्ष धंदा घरकाम रा. कायगाव ता. गंगापूर जि, छत्रपती संभाजीनगर ब. लक्ष्मण पांडूरंग ईष्टके वय ३८ वर्ष धंदा शेती रा. कायगाव ता. गंगापूर जि, छत्रपती संभाजीनगरक) पल्लवी सुभाष भोकरे वय ३५ वर्ष धंदा घरकाम रा. कोल्हार ता. राहता जि. अहिल्यानगर ड. संतोष पांडूरंग ईष्टके वय ३० वर्ष धंदा शेती रा. कायगाव ता. गंगापूर जि, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार:निरंक

प्रकरणः हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

मयत मारूती नामदेव ईष्टके हे कायगाव ता. गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०८/१२/२०२३ रोजी राहते घरी अल्पशा आजाराने मयत झाले. अर्जदार क्र. १ ते ५ हे त्यांचे मुले व मुली असून अर्जदार क्र. ५ पांडुरंग मारुती ईष्टके हा त्यांचा मुलगा दिनांक ०३/०३/२०२२ रोजी मयत झाला असून मयत पांडुरंग मारुती इष्टके यांचे वारस क्र. अ. ते ड हे आहेत. मयत मारूती नामदेव ईष्टके यांची पत्नी नामे रुखमीनीबाई मारुती ईष्टके या दिनांक १३/०२/१९९८ रोजी मयत झाल्या आहे. आता मयत मारुती नामदेव ईष्टके यांना अर्जदार क्र १ ते ४ व ५ अते ड हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयत मारुती नामदेव ईष्टके यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार हेच मयत मारुती नामदेव ईष्टके यांचे कायदेशिर वारसदार आहेत.

२) असे की. अर्जदार यांना शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत मारुती नामदेव ईष्टके यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संवन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक ट६/०७/२०२५ रोजी दिले.

लिपिक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग
## जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
### प्रशासकीय ईमारत, हिंगोली

मेलः dpohingoli431513@gmail.com.
फॅक्स क्र. ०२४५६-२२१४५९
दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१४५०

जा.क्र.२०२५/नपाप्र/कावी -
दिनांकः- ०५/११/२०२५

**नमुना-१**
**(नियम ४ व ५ पहा)**

वाचा :- मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२५/निका/नप/प्र.क्र.१४/का-६ दिनांक ०४/११/२०२५.

### आदेश

महाराष्ट्र नगर पालिका निवडणुक नियम १९६६ च्या नियम ४ व ५ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी. **राहुल गुप्ता, जिल्हाधिकारी हिंगोली** या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-१ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मतदार प्रभागांमधुन **नगर परिषद वसमतसाठी** घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या संबंधात पुढील नेमणूका व तारखा निश्चित करीत आहे.

अ. स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचन अधिकाऱ्यांचे किंवा सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यांचे नाव (स्तभं १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रभागासमोर निर्दिष्ट करण्यात आलेले नाव, ज्याचा यापुढे प्रभागासमोरील असा उल्लेख करण्यात आला आहे).

ब. स्तंभ ३ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी अखेरची तारीख व वेळ असेलः

क. स्तंभ ५ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची तारीख व वेळ असेल.

ड. स्तंभ ६ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही नामनिर्देशनपत्रे छाननी करण्याची तारीख व वेळ असेल.

ई. स्तंभ ७ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली जागा नामनिर्देशनपत्रे छाननी करण्याची उमेदवारी याची प्रसिध्द करण्याची तारीख असेल.

फ. स्तंभ ६ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट केलेली तारीख विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित केलेली उमेदवारी यादी प्रसिध्द करावयाची तारीख असेल.

ग. स्तंभ ८ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही उमेदवारी मागे घेण्याची अखेरची तारीख असेल.

ह. स्तंभ ९ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही निवडणूक लढविणाऱ्या उमदेवारांची यादी प्रसिध्द करावयाची तारीख असेल,

य. स्तंभ १० मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख किवा तारखा आणि वेळ या मतदान ज्या तारखांना आणि ज्या वेळात घ्यावयाचे असेल ती तारीख / त्या तारखा व वेळ असेल असतील.

ज. स्तंभ ११ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही मततोजणी तारीख व वेळ असेल.

झ. स्तंभ १२ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली जागा मतमोजणी संबंधीची जागा असेल.

दिनांक :- ०५/११/२०२५
ठिकाण :- हिंगोली

स्वाक्षरीत/-
राहुल गुप्ता (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, हिंगोली

## अनुसूची

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागाचे (वार्डाचे) नाव किंवा क्रमांक | प्रभाग क्र. १ ते १५ |
| २-अ | निर्वाचन अधिकाऱ्यांचे नाव | विकास माने, उपविभागीय अधिकारी, वसमत |
| २-ब | सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यांचे नाव | मुख्याधिकारी न.प. वसमत |
| ३-अ | नामनिर्देशनपत्रे राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी | दि.१०/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ (दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत) |
| ३-ब | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि.१०/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ (दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत) रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची जागा | उपविभागीय अधिकारी कार्यालय वसमत |
| ५ | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीची तारीख | दिनांक. १८/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे छाननी व मागे घेण्याची जागा | १. छाननी चे ठिकाणः बैठक हॉल तहसिल कार्यालय वसमत २. उमेदवारी मागे घेण्याची जागा उपविभागीय अधिकारी कार्यालय वसमत |
| ७ | विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याची तारीख | दिनांक. १८/११/२०२५ सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ८-अ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या अंतिम दिनांक (अपिल नसेल तेथे) | दि.१९/११/२०२५ ते २१/११/२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ८-ब | अपिल असल्यास नामनिर्देशपत्रे मागे घेण्याचा कालावधी | दि.२१/११/२०२५ ते २५/११/२०२५ |
| ९ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याची तारीख | दिनांक २६/११/२०२५ |
| १० | मतदान ज्या तारखेस किंवा तारखांस आणि ज्या वेळी घेण्यात येईल ती तारीख किंवा तारखा व वेळ | दिनांक. ०२/१२/२०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ११ | मतमोजणीची तारीख व वेळ | दिनांक ०३/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन |
| १२ | मतमोजणीचे ठिकाण | कै.गंगाप्रसाद अग्रवाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परभणी रोड, वसमत |

स्वाक्षरीत/-
राहुल गुप्ता (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, हिंगोली

## अग्रलेख...

# लोकतंत्राचा जागर होत राहावा...

दोन-अडीच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर महाराष्ट्रातील नगर पालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्य निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया सुरू केली असून, राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी, नागरिकांसाठी आणि एकूणच लोकतांत्रिक व्यवस्थेसाठी हा महत्त्वाचा प्रसंग आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व तेथील सदस्यांचा संबंध सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट असतो. कोरोनाची भयंकर साथ गेली आणि या निवडणुका रेंगाळत राहिल्या. बऱ्याच मोठ्या कालावधीत नागरी समस्यांचा डोंगरही वाढत गेला. जनता-प्रशासन-स्थानिक राजकीय नेतृत्व यांच्यातील संवाद-सेतू तुटत गेला.

मागील दोन-अडीच वर्षांच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय राजवट होती. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, विविध प्रकारच्या परवानग्या आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या मूलभूत नागरी गरजांकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन काहीसा उदासीन दिसला. कारण ते स्थानिक नव्हते आणि लोकप्रतिनिधींएवढे जबाबदार नव्हते. परिणामी, एक ना धड भाराभर चिंध्या, असे अनेक योजनांचे झाले. जनतेने निवडून दिलेले निर्वाचित लोकप्रतिनिधीच नसल्याने लोकांचा आवाज, त्यांचे प्रश्न मांडण्याची सोयच नव्हती. नगरपरिषद, नगरपंचायतींची सत्ता प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हाती एकवटली होती. त्याचा दुरुपयोगही मोठ्या प्रमाणात झाला. त्यांना हवे होते ते त्यांनी या काळात आपल्या पदरात पाडून घेतले. सामान्य नागरिक आणि प्रशासकीय यंत्रणा तसेच पर्यायाने सरकार यांच्यात मोठी दरी या काळात निर्माण झाली आणि ही दरी भरून काढण्याचे आव्हान आता या निवडणुकीच्या निमित्ताने सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांपुढे उभे ठाकले आहे. खासदार-आमदार-मंत्र्यांना त्यांच्या पक्षाचे स्थान या निमशहरी भागांत मजबूत करायचे आहे. ही निवडणूक त्यांची नाही, पण त्यांच्या पाठीराख्यांची आहेच. त्या साऱ्या नेत्यांची प्रतिष्ठा आता या निवडणुकीत पणाला लागणार आहे. त्यांना थेट जनतेत जाऊन आपल्या पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणावे लागणार आहे. ही निवडणूक केवळ नगरसेवकांची नाही, तर स्थानिक नेतृत्वाच्या ताकदीची, त्यांच्या विश्वासार्हतेचीही परीक्षा घेणारी आहे. गेल्या वर्षी कार्यकर्त्यांनी या नेत्यांना निवडून आणले, आता नेत्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांना विजयी करण्यासाठी झटावे लागणार आहे. या वेळीही नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार आहे. मागच्या निवडणुकीपासून ही पद्धत सुरू झाली असली तरी ती अद्याप पूर्णपणे रुळली, असे म्हणता येणार नाही. या पद्धतीमुळे नगराध्यक्षाला अधिक अधिकार प्राप्त होतात हे खरे आहे. पण, त्याचबरोबर नगरसेवकांसोबत सामंजस्य टिकवून ठेवण्याचे व कामे पुढे नेण्याचे आव्हानही त्यांच्यासमोर असते. नगराध्यक्ष एका पक्षाचा असेल आणि नगरसेवकांचे बहुमत इतर पक्षाचे असेल तर शहराच्या विकासाचे आवश्यक निर्णय घेताना राजकीय संघर्ष उद्‌भवण्याची शक्यता बळावते. त्यामुळे निवडून येणारा नगराध्यक्ष कार्यक्षम आणि नगरसेवकांशी सलोखा असलेला व लोकभावनेची उत्तम जाण असणारा असावा, अशी तिहेरी अपेक्षा मतदाराला असेल. त्याचसोबत सत्ता स्थापनेतील 'घोडेबाजार' टाळण्याचा हा योग्य प्रसंग असेल आणि नव्या नेतृत्वाला उदयाची संधी देणाराही हा काळ असेल, यात वाद नाही.

मध्यंतरीच्या काळात या ना त्या कारणामुळे निवडणुका पुढे ढकलल्या जात राहिल्या. नगराच्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना भेटण्यासाठी लोक ताटकळत राहिले. त्यांचा आवाज स्थानिक स्वराज्य संस्थेत पोहचवणारे (मुदत संपल्याबरोबर माजी झालेले) नगरसेवकही पुढ्यात निवडणुका नव्हत्या म्हणून टाळाटाळ करू लागले होते. त्यामुळे लोकांच्या समस्या प्रलंबितच राहिल्या. काही अपवाद वगळता बहुतेक ठिकाणी नोकरशाहीवर अजिबातच अंकुश नव्हता. आता या साऱ्या अनिष्टाला छेद देत नव्या स्थानिक लोकतंत्राचा जागर होणार आहे. लोकशाहीचा तिसरा स्तर फार मोठ्या अवकाशानंतर पुन: अस्तित्वात येत आहे. आपल्या देशात त्रि-स्तरीय लोकशाही आहे. याचाच अर्थ, शासनाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या तीन स्तरांत विभागल्या आहेत. केंद्रीय सरकार हा पहिला स्तर, दुसरा राज्य सरकार आणि तिसरा स्तर स्थानिक स्वराज्य संस्था. भारतीय संविधानातील ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून हा तिसरा स्तर जोडला गेला. त्यामुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरण झाले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी मिळाली. हा सर्वांत खालचा स्तर असला तरी लोकांच्या सर्वांत जवळचा आहे. अशी ही व्यवस्था आता बऱ्याच कालावधीनंतर पुन्हा अस्तित्वात येत असल्याने नागरिक व ग्रामस्थांमध्ये चैतन्य आहे. राजकीय पक्षांचे कार्यकर्तेही मोठ्या उत्साहात आहेत. निवडणूक हा आपल्याकडे उत्सवच असतो. यावेळी तो तिसऱ्या पण महत्त्वाच्या स्तरातील लोकशाहीचा आहे याचा आनंद सर्वांनाच झाला आहे. या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर उठलेले मतदारयाद्यांवरील शंका-कुशंकांचे सावट कायम आहे. निर्दोष मतदारयाद्या, भरपूर मतदार आणि भरपूर मतदान हा लोकशाहीच्या बळकटीचा आधार असतो. मतदारयाद्यांमध्ये अनेक पात्र मतदारांची नावे वगळली जाणे, एकाच मतदाराचे नाव अनेकदा समाविष्ट असणे किंवा स्थलांतरित झालेल्या मतदारांचे नाव काढले न जाणे अशा अनेक त्रुटी असल्याबाबतचे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी ते अगदी राज्य व जिल्हा स्तरावरील विरोधी नेते बोंबा ठोकत आहेतच. अशा काही तक्रारी असल्यास त्या सुयोग्य व विधायक मार्गाने मांडण्याचा पूर्ण अधिकार विरोधकांनाच नव्हे, तर नागरिकांना देखील आहे आणि म्हणूनच निवडणूक आयोगाने सुद्धा 'एसआयआर'ची घोषणा केली आहे. मतदारयाद्यांचे पुनरीक्षण हे लोकशाहीच्या सबलीकरणाचे स्वागतार्ह पाऊल ठरणार आहे. जवळपास ५१ कोटी मतदारांची या माध्यमातून फेरतपासणी केली जात आहे. खरे तर, निवडणूक ही प्रक्रिया समाजातील मते-मतांतरे, सहमती-असहमतीची दखल घेण्यासाठी आणि जनतेच्या मनात काय आहे, हे स्पष्ट करण्यासाठीच पार पाडली जाते. निवडणूक म्हणजे लोकशाहीचे अमृतमंथन आहे. या मंथनातून जे काही बाहेर येईल ते जनतेसाठी, त्यांच्या कल्याणासाठी व लोकशाहीच्या बळकटीकरणासाठीही फायदेशीर ठरत असते. त्यामुळे मतदारयाद्यांच्या फेरतपासणीबद्दलचे हेत्वारोप निरर्थक ठरतात. निवडणुका मुक्त व निष्पक्ष वातावरणात निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने अपार काळजी घ्यावी, अशी अपेक्षा आहे. तसे झाले तर हेत्वारोपांची दुमदुम आपसूक थंडावेल. महाराष्ट्रातील अर्धनागरी भागातील लोकशाहीसाठी ही निवडणूक एक नवी पहाट घेऊन आली आहे. या संधीचे सोने करण्याची जबाबदारी जशी निवडणूक आयोगाची आहे, तशीच ती राजकीय पक्षांची आणि नागरिकांचीही आहे. राजकीय पक्ष आणि नेत्यांनी केवळ सत्तेसाठी आश्वासनांची खैरात वाटू नये. त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा घेऊन जनतेसमोर जावे. खऱ्या स्थानिक प्रश्नांची जाण असणे आणि त्यावर दीर्घकालीन उपाययोजना कशी करणार, हे जनतेसमोर सिद्ध करावे. आपल्या पक्षाच्या उमेदवारांची निवड करताना नैतिकता, कार्यक्षमता आणि स्वच्छ चारित्र्य या गुणांना प्राधान्य द्यावे. मतदारांनी देखील भावनिक आवाहनांना न भूलता आपल्या मताधिकाराचा शहराच्या विकासासाठी उपयोग करावा. उमेदवाराची गुणवत्ता, पक्षाची नीतिमत्ता व इतिहास आणि शहराच्या विकासासाठी असलेली निष्ठाही मतदारांना तपासावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेसे लोकप्रतिनिधी आपल्या घराच्या, आपल्या गल्लीच्या आणि आपल्या शहराच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा असतो. जबाबदार नागरिक म्हणून फक्त मतदानापुरते जागे न राहता, आपल्या लोकप्रतिनिधींवर सतत दबाव आणि देखरेख ठेवणे हेही आपले कर्तव्य समजले पाहिजे. या निवडणुकीतून कार्यक्षम आणि दूरदृष्टी असलेले नवे नेतृत्व उदयास येईल आणि तुटलेला 'संवाद-सेतू' पुन्हा बांधून नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता केली जाईल, अशी आशा करू या. निवडणुकीचा बिगुल वाजला, असे आपण म्हणतो तेव्हा जनसेवेचा अर्थात लोकतंत्राचाच जागर केला जात असतो, हे साऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. तो सतत होत राहावा, हीच सर्व लोकशाहीवादी नागरिकांची अपेक्षा आहे.

## तंत्रवेध

# अजेंटिक एआयची वेधक वाट

**डॉ. दीपक शिकारपूर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झेप नजीकच्या काळात अनेक क्षेत्रांवर आपला प्रभाव दाखवायला सुरुवात करेल. अनेक क्षेत्रे या तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र बदलतील. गेल्या काही वर्षांमध्ये जेन आय टूल्स (उदा जेमिनी, चॅटजीपीटी)चा वापर वाढला. झटपट ज्ञानप्राप्तीसाठी अनेक विद्यार्थी आज त्यांचा वापर करतात. त्यामुळे माहितीची (अगदी चित्र, ध्वनी, व्हिडीओसकट) निर्मिती करणे सुलभ व सुपरफास्ट झाले. आता पुढचा टप्पा गाठायची वेळ आली आहे. त्यासाठी अजेंटिक एआय समजून घेणे महत्वाचे आहे. अजेंटिक एआय केवळ 'स्मार्ट' नाही, तर 'स्वायत्त' आहे. म्हणजेच, हे एआय स्वतः विचार करून कृती करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे रूप बदलू शकते. स्मार्ट म्हणजे मानवी उत्पादकता वाढवणाऱ्या प्रणाली आणि उत्पादने. अजेंटिक ही त्याच्या पुढची पायरी आहे. अजेंटिक एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली, जी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वायत्तपणे कार्य करू शकते, निर्णय घेऊ शकते आणि मर्यादित मानवी देखरेखीसह कृती करू शकते. हे पारंपरिक एआयच्या पलीकडे जाणारे एक पाऊल आहे. अजेंटिक एआय सिस्टिममध्ये अनुभवातून शिकण्याची, गतिमान वातावरणाशी जुळवून घेण्याची आणि जटिल उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर एआय सिस्टिमशी सहयोग करण्याची क्षमता अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत. हे थोडेफार मानवी मेंदूसारखे आहे. यामुळे एआय अधिक प्रभावीपणे मानवासारखा विचार आणि सहयोग करू शकते.

अजेंटिक एआय एजंट म्हणजे अशी एआय प्रणाली, जी आपल्या माहितीजालातून माहिती गोळा करते, स्वत: शिकलेल्या अनुभवांवर आधारित तर्क करते आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय बहु-टप्प्यांची कार्ये पूर्ण करते. हे एजंट्स जटिल समस्यांना लहान उप-कार्यांमध्ये विभागतात, साधने वापरतात आणि अंतिम ध्येय गाठेपर्यंत सतत स्वत:च्या कृतींचे मूल्यांकन करतात. थोडक्यात, हे एजंट्स जनरेटिव्ह एआयच्या निर्मितीक्षमतेचा वापर करून, त्याला कार्यान्वित करणारी एक निर्णायक शक्ती प्रदान करतात. यात मानवी हस्तक्षेप मर्यादित असतो. पारंपरिक एआयच्या तुलनेत अधिक कार्यक्षम असणारी अजेंटिक एआय स्वतंत्रपणे काम करू शकते. ही यंत्रणा अनुकूलता पूर्व-परिभाषित नियमांचे पालन करत अनुभवातून शिकते आणि बदलांशी जुळवून घेते. स्वतंत्र निर्णय घेऊ शकते. गुंतागुंतीची तसेच सोपी कामे आणि कार्यप्रवाह हाताळते. जटिल, बहु-चरणीय कार्ये हाताळते. अजेंटिक एआयचा उद्योगक्षेत्रात मोठा प्रभाव पडत आहे. भविष्यात हा प्रभाव अधिक वाढणार आहे. याचा वापर करून उद्योग अधिक कार्यक्षम,



उत्पादक आणि स्पर्धात्मक बनू शकतात. शिक्षणक्षेत्रात हे तंत्र महत्त्वाची कामगिरी बजावू शकते. शिक्षक एआयकडे एक सहयोगी म्हणून पाहतील. सध्या पारंपरिक शिक्षणव्यवस्थेमध्ये शिक्षकांना अनेकदा अशैक्षणिक (कारकुनी) काम मोठ्या प्रमाणावर करावे लागते. हे काम अजेंटिक एआय करू शकते. त्यामुळे शिक्षकांची शैक्षणिक उत्पादकता अनेक पटींनी वाढेल.

अजेंटिक एआय विशेषतः विज्ञान आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये व्हर्च्युअल लॅब्ज आणि इमर्सिव्ह लर्निंग वातावरणाची निर्मिती करेल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासारखे शिक्षण मिळेल. अनेकदा प्रात्यक्षिकांसाठी उद्योगांमध्ये प्रत्यक्ष भेट आवश्यक ठरते. आता त्याची गरज राहणार नाही. आपल्या संगणकावर आणि पडद्यावर आपण उन्नत अनुभव घेऊ शकू. एआय-आधारित मूल्यांकन प्रणाली अधिक अचूक, जलद आणि वैयक्तिककृत अभिप्राय देतील. परीक्षा पद्धतींमध्ये बदल करून विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कौशल्यांचे मूल्यांकन करण्यावर भर दिला जाईल; केवळ स्मरणशक्तीवर भिस्त राहणार नाही. ही पद्धत सरावासाठी मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिकेचे पृथक्करण करून विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्न आणि नंतर अचूक उत्तरे सांगू शकते. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेसाठी अधिक चांगल्या प्रकारे सज्ज होतील तसेच आपल्या उत्तरांचे पृथक्करण करून कुठे जास्त अभ्यासाची गरज आहे हे समजून घेतील. पारंपरिक गाईड्सना याचा मोठा धोका आहे. कसा अभ्यास करून जास्त गुण मिळवता येऊ शकतील याचे मार्गदर्शन अजेंटिक एआय विद्यार्थी आणि शिक्षकांना देईल. याचा मोठा फायदा ग्रामीण आणि निमशहरी भागातील शैक्षणिक संस्थांना होईल कारण अशा ठिकाणी चांगले शिक्षक मिळणे अवघड असते.

अजेंटिक एआय एजंट या नव्या पिढीतील स्वायत्त प्रोग्राममुळे कार्यप्रणाली अधिक स्मार्ट, वेगवान आणि व्यक्तिगत बनली आहे. अजेंटिक एआय एजंट वैयक्तिक डिजिटल शिक्षणात विद्यार्थ्यांसाठी हवे तसे मार्गदर्शन करून देतील. हे एजंट विद्यार्थ्याची क्षमता आणि कमतरता ओळखून शिकण्याचा रास्त मार्ग निवडतात. शिक्षकांना वेळ वाचवण्यासाठी हे एजंट्स परीक्षा तपासणी, उपस्थिती मापन, गृहपाठ मदत व निकालवर्धन असे फायदे देतात. विज्ञान व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये व्हर्च्युअल लॅब्ज, इमर्सिव्ह लर्निंग अनुभव देत ग्रामीण आणि निमशहरी संस्थांसाठी शिक्षणाची दारे खुली करतात. साधनसंपत्तींची कमतरता असलेल्या शाळा तसेच महाविद्यालयांसाठी हे फारच उपयुक्त आहे. शिकण्याचे नवे क्षितिज खुले होत असताना डेटाची गोपनीयता आणि तंत्रज्ञानाचा समावेश ग्रामीण भागात वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अजेंटिक एआय टूल्स केवळ प्रयोगशाळांपुरती मर्यादित नाहीत. अशी टूल्स आता व्यवसाय आणि शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्षात वापरली जात आहेत एकंदरीत, अजेंटिक एआयमुळे भारतातील उद्योग आणि शिक्षणक्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होतील. उत्पादकतेत वाढ, नवीन नोकऱ्यांची निर्मिती आणि शिक्षणात क्रांती घडवून आणण्याची क्षमता यात आहे. मात्र, यासोबतच कौशल्य अंतर, डेटा गोपनीयता आणि नैतिक वापर यांसारख्या आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे; जेणेकरून भारताला या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा घेता येईल. भविष्यात, हे एजंट्स अधिक चतुर आणि संवादात्मक बनतील. येत्या काही वर्षांमध्ये हे एजंट्स उद्योगांची कार्यक्षमता वाढवून आणि मानवी कामाचे स्वरूप बदलवतील.

'एआय २०३० इंडिया' उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देणे हा याचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करणे, हे या तंत्राचे ध्येय मानले गेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालय, नॅसकॉम आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे सेंटर फॉर द फोर्थ इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन इंडिया याचे नेतृत्व करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे एकविसाव्या शतकातील सर्वांत प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. 'एआय फॉर इंडिया २०३०' धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# बालसुरक्षेची घंटा

गडचिरोली जिल्ह्याच्या अहेरी तालुक्यातील नागेपल्ली येथील आशीर्वाद वसतिगृहवर जिल्हा प्रशासनाने केलेली ऐतिहासिक कारवाई म्हणजे केवळ एक प्रशासकीय कृती नव्हे, तर बालसुरक्षेच्या दिशेने उचललेले धाडसी आणि संवेदनशील पाऊल आहे. तब्बल ११ वर्षांपासून विना परवानगी सुरू असलेले हे वसतिगृह म्हणजे मुलांच्या भवितव्याशी झालेला थेट खेळच म्हणावा लागेल. बाल न्याय अधिनियम २०१५ आणि २०२१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून अशा संस्थेचा कारभार सुरू ठेवणे, हा फक्त कायद्याचा भंग नाही, तर समाजाच्या नैतिक जबाबदारीलाही एक मोठा धक्का आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय अधिकारी कुशल जैन, तहसीलदार बालाजी सोमवंशी तसेच महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त पथकाने पार पाडली. या कारवाईत ९१ निराधार बालकांची सुटका करून त्यांना शासकीय संरक्षणाखाली सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. ही कारवाई केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नसून जिल्ह्यात किंवा राज्यभरातील अशा सर्व विनापरवाना संस्थांसाठी तो एक गंभीर इशारा आहे.

मुलं ही कोणत्याही समाजाची पायाभूत संपत्ती असतात. त्यांच्या सुरक्षिततेची आणि संगोपनाची जबाबदारी केवळ पालकांची किंवा सरकारची नसून संपूर्ण समाजाची आहे. नागेपल्लीसारख्या गावात, प्रशासनाच्या नावाखाली तब्बल ११ वर्षांपासून अनधिकृतपणे वसतिगृह चालवले जात होते, हे अत्यंत चिंताजनक आहे. या संस्थेत मुलं आणि मुली दोघांनाही एकत्र ठेवण्यात आले होते, हीच बाब अधिक धोकादायक ठरते. कारण अशा ठिकाणी लैंगिक, मानसिक आणि शारीरिक शोषणाची भीती नेहमीच निर्माण होते. यामुळे अशा संस्थांच्या नियमित तपासण्या आणि नोंदणी प्रक्रियेवर प्रशासनाने अधिक काटेकोर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या वसतिगृहात ख्रिश्चन धर्मप्रचाराशी संबंधित साहित्य आढळल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुलांच्या संगोपनाच्या नावाखाली कोणत्याही धर्माचा प्रसार करणे हे कायद्याने गुन्हा आहे. धर्मप्रसाराच्या आडून गरीब व निराधार मुलांना मानसिकदृष्ट्या प्रभावित करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्यांच्या निरागसतेचा गैरफायदा घेणे होय. शिक्षण, अन्न व निवारा या मूलभूत गरजांच्या आडून जर धर्मांतराचे बीज पेरले जात असेल, तर तो समाजासाठी एक गंभीर धोका आहे. प्रशासनाने या प्रकरणात दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे; परंतु प्रश्न असा उभा राहतो की, ११ वर्षे हा प्रकार सुरू असताना कोणाच्या नजरेस का आला नाही? तालुका प्रशासन, स्थानिक पोलिस, ग्रामपंचायत, शाळा आणि समाजातील नागरिक सगळेच कुठे ना कुठे बेफिकीर होते का? बालकांचे रक्षण हा केवळ कागदोपत्री कार्यक्रम राहिला आहे का, असा प्रश्न यानिमित्ताने विचारायलाच हवा. एखाद्या जिल्ह्यात किंवा तालुक्यात जर कोणतेही बालगृह, वसतिगृह किंवा अनाथालय चालवले जात असेल, तर त्या संस्थेची नोंदणी असणे बंधनकारक आहे. त्या संस्थांवर नियमित तपासणी होणे, आर्थिक लेखापरीक्षण पारदर्शक असणे तसेच बालकांच्या आरोग्य, शिक्षण व मानसिक स्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जाणे आवश्यक आहे; प्रत्यक्षात हे होत नाही. एकदा संस्था सुरू झाली की, तिच्यावर कोणी लक्ष देत नाही.

आज प्रशासनाने धाडस दाखवून ही कारवाई केली, पण उद्या अशाच स्वरूपाचे अजून किती आशीर्वाद होस्टेल आपल्याकडे कार्यरत आहेत, हे तपासणेही तितकेच महत्त्वाचे ठरते. बालकांवर होणाऱ्या अत्याचारांचे अनेक प्रकार समाजात दिसतात. शारीरिक छळ, कामाला लावणे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, लैंगिक अत्याचार, मानसिक त्रास... हे सगळं थांबवायचं असेल तर प्रणाली मजबूत करावी लागेल. अनेकदा अशा संस्थांमधून बालकांना धार्मिक शिक्षण, आर्थिक मदत किंवा शिक्षणाच्या नावाखाली वेगवेगळ्या ठिकाणी हलवले जाते आणि त्यानंतर त्यांचा मागमूसही लागत नाही. हे केवळ गडचिरोली किंवा अहेरीपुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अशा संस्था अस्तित्वात आहेत. या संस्थांच्या मागे कोणते नेटवर्क आहे, कोण निधी पुरवतो आणि या संस्थांमध्ये बालकांची निवड कशी केली जाते, यावर स्वतंत्र चौकशी समिती नेमणे अत्यावश्यक आहे. गडचिरोली जिल्ह्यात झालेल्या या कारवाईने नक्कीच संपूर्ण राज्यातील अनधिकृत संस्थांना इशारा मिळाला आहे. मात्र या इशाऱ्याचे रूपांतर कायमस्वरूपी सुधारण्यात होण्यासाठी सातत्याची आवश्यकता आहे. आज गरज आहे ती 'बाल संरक्षण संस्कृती' रुजविण्याची. बालकांवरील अत्याचारांविरोधात शून्य सहिष्णुतेची भूमिका घेतली पाहिजे. कारण भविष्यातील भारत या बालकांच्या हातात आहे आणि त्यांचे हात सुरक्षित ठेवणे हीच खरी देशसेवा ठरेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# कोण होणार बिहारचा नवा मुख्यमंत्री?

**श्यामकांत जहागीरदार**

बिहार विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातील १२१ जागांसाठी गुरुवार, ६ नोव्हेंबरला मतदान होत आहे. दुसऱ्या टप्प्यातील १२२ जागांसाठी मंगळवार, ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दोन्ही टप्प्यांतील निवडणुकांची मतमोजणी शुक्रवार, १४ नोव्हेंबरला होणार आहे. त्यानंतर बिहारच्या नवा मुख्यमंत्री कोण, याचा निर्णय होणार आहे. महाआघाडीने राजद नेते तेजस्वी यादव यांचे नाव मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून पुढे केले आहे. त्यामुळे यदाकदा महाआघाडीला बहुमत मिळाले तर तेजस्वी यादव मुख्यमंत्री होणार, हे नक्की. रालोआला बहुमत मिळाले तर मुख्यमंत्री कोण होणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.

विद्यमान मुख्यमंत्री जदयुचे नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआ विधानसभेची निवडणूक लढवत आहे. भाजपाने तसे जाहीरही केले आहे. निवडणुकीनंतर नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील, असे जदयुने वारंवार स्पष्ट केले. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला लोजपा रामविलासचे नेते केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. २०२० ची विधानसभा निवडणूक चिराग पासवान यांनी स्वबळावर लढवली होती; स्वबळावर लढवली म्हणण्यापेक्षा जदयुच्या विरोधात लढवली होती. १३१ जागा लढवणाऱ्या लोजपाला फक्त एक जागा जिंकता आली. मात्र, त्याने अनेक मतदारसंघात जदयुचा पराभव केला. त्यामुळे जदयुचे संख्याबळ कमी झाले. ८० जागांवरून हा पक्ष ४३ जागापर्यंत खाली घसरला. त्यामुळे यावेळी चिराग पासवान यांची नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला पाठिंबा द्यावा, याचे महत्त्व जदयु आणि नितीशकुमार यांच्यासाठी अनन्यसाधारण आहे. यावेळी लोजपा रामविलास रालोआचा घटक पक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवत आहे. जागावाटपात या पक्षाला २९ जागा मिळाल्या. लोजपा रालोआत आल्याचा सर्वांत मोठा फायदा जदयुला मिळणार आहे. लोजपा जदयुची मते खाणार नसल्यामुळे यावेळी जदयुचे जास्त म्हणजे मागील विधानसभा निवडणुकीत जिंकले त्यापेक्षा जास्त उमेदवार निवडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रालोआ ही निवडणूक मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवत आहे. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची खुर्ची रिकामी नाही, असे भाजपा नेते वारंवार सांगत आहे. या निवडणुकीत रालोआला बहुमत मिळणार, याबद्दल कोणाच्याच मनात शंका नसली, तरी मुख्यमंत्री कोण होणार, याबद्दल मात्र उत्सुकता आहे. नितीशकुमार पुन्हा मुख्यमंत्री होण्याची शक्यता सर्वांत जास्त असली, तरी राजकारणात कधी काय होईल, हे कोणीच सांगू शकत नाही.



देशात बिहार हे एकमेव असे राज्य म्हणावे लागेल, ज्यात जवळपास २० वर्षांपासून सत्तेवर असला तरी भाजपाला मुख्यमंत्रिपद कधी मिळाले नाही. २० वर्षांपासून भाजपाला उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागते. सुरुवातीला भाजपाला एक उपमुख्यमंत्री मिळत होता. २०२० च्या विधानसभा निवडणुकीनंतर दोन उपमुख्यमंत्री मिळत आहेत. पण दोन उपमुख्यमंत्री मिळून एक मुख्यमंत्री होत नाही. मुख्यमंत्री हा मुख्यमंत्रीच असतो. त्यामुळे यावेळी तरी किमान आपला मुख्यमंत्री व्हावा, असे त्या राज्यातील भाजपाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. भाजपाला मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घाईगर्दीत घेता येणार नाही. राजकारणातील सर्व शक्यता पडताळूनच भाजपाला बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घ्यावा लागेल. कारण भाजपाच्या या निर्णयाचा परिणाम फक्त बिहारमध्येच नाही तर राष्ट्रीय राजकारणावरही होण्याची शक्यता आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळाले नाही. भाजपाचा विजयरथ २४० जागांवर अडला. भाजपाला बहुमतासाठी ३२ जागा कमी पडल्या. त्यामुळे केंद्रातील मोदी सरकारला चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसमचा आणि नितीशकुमार यांचा जनता दल संयुक्तचा पाठिंबा घ्यावा लागला. तेलगू देसमचे लोकसभेत १६ आणि जदयुचे १२ खासदार आहेत. केंद्रातील मोदी सरकार नितीशकुमार यांच्या जदयुवर बऱ्यापैकी अवलंबून आहे. त्यामुळे नितीशकुमार यांना दुखावणे भाजपाला तसे परवडणारे नाही.

गेल्या काही वर्षांत नितीशकुमार यांची प्रकृती ठीक राहात नाही, चालताना आणि बोलताना त्यांचा तोल जातो, स्मरणशक्तीही पहिलेसारखी राहिली नाही. तरीसुद्धा नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा मोह सुटत नाही. नितीशकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ देशात सर्वांत जास्त नसला, तरी देशात सर्वांत जास्त वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे म्हणून त्यांचे नाव नोंदले गेले आहे. यावेळी नितीशकुमार मुख्यमंत्री झाले तर दहाव्यांदा ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, त्यावरही राज्यातील पुढील राजकीय समीकरणे अवलंबून राहणार आहेत. भाजपा राज्यात सर्वांत जास्त जागा जिंकणारा पक्ष राहील, दुसऱ्या क्रमांकासाठी जदयु आणि राजदमध्ये टक्कर होईल. राजद दुसऱ्या क्रमांकावर आला तर जदयु तिसऱ्या क्रमांकावर जाईल आणि जदयु दुसऱ्या क्रमांकावर आला, तर राजद तिसऱ्या क्रमांकावर जाईल. काँग्रेस चौथ्या स्थानावर राहील. म्हणजे भाजपा आणि काँग्रेस यांचे बिहारच्या राजकारणातील स्थान पक्के आहे.

जदयु आणि राजद यांच्या आमदारांची बेरीज १०० च्या वर जात असेल तर भाजपाला आपल्या व्यूहरचनेचा फेरविचार करावा लागेल. कारण भाजपाने नितीशकुमार यांना डावलून आपला मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला तर नितीशकुमार भाजपाला धक्का देऊ शकतात. नितीशकुमार भाजपाला धक्का देतीलच असे नाही, पण धक्का देण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण याच्या आधी दोन वेळा नितीशकुमार भाजपाची साथ सोडून राजदसोबत गेले होते आणि त्यांनी सरकारही स्थापन केले होते. नितीशकुमार कधी कोणती भूमिका घेतील, हे सांगता येत नाही. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा मित्र नसतो, तसाच शत्रूही नसतो. नितीशकुमार ज्यावेळी भाजपाचे मित्र होतात, तेव्हा राजदला शत्रू समजतात आणि राजदचे मित्र होतात, तेव्हा भाजपाला शत्रू समजतात. नितीशकुमार यांच्या शत्रू आणि मित्राच्या भूमिकेतील बदल अतिशय जलदगतीने होत असतो. नितीशकुमार यांचे राजकारण अनाकलनीय म्हणावे लागेल.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपापेक्षा जदयुच्या जागा कमी होत्या, तरीसुद्धा भाजपाने मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांना दिले होते. यावेळीही त्याच इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारत येत नाही. जदयुला भाजपापेक्षा जास्त जागा मिळाल्या तर मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडे जाईल आणि भाजपापेक्षा जदयुच्या जागा कमी असल्या, तरी नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील. विधानसभा निवडणुकीनंतर वर्षभर तरी नितीशकुमार रालोआचे मुख्यमंत्री असतील. नितीशकुमार यांचा जन्म मुख्यमंत्रिपदासाठीच झाला, असे म्हणावे लागेल. कधी नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाच्या मागे धावतात तर कधी मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्या मागे धावत येते.

९८८१७१७८१७

## आजचे संघगीत-३४

गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५

### माघार न जन्मात, सारखे होउ देत आघात

माघार न जन्मात; सारखे होउ देत आघात ॥धृ.॥

देशाचे भवितव्य दिव्य अति घडवू,
हो रात्रंदिन निश्चिति असे वसत हृदयात ॥१॥

सान ज्योत फुंकरली जाई साथ परी
वणव्याते देई भयाण झंझावात ॥२॥

ध्येयसाधना अमुचे जीवन हर्षित हृदये
स्वार्थविसर्जन पशुतेवरही मात ॥३॥

होता मारा कटु शब्दांचा तोल न जाइल
कधी मनाचा करु धैर्याने मात ॥४॥

परंपरेची ज्वलंत प्रीती घडविल या
राष्ट्राची प्रगती विकसन हे अभिजात ॥५॥

भेद बेगडी निपटू आता शुद्ध मनाने
करू एकता हीच यशाची वाट ॥६॥

### सत्याजवळ सदैव परमेश्वराचा वास

सत्य मार्ग, सत्य बोली, सत्य वर्तन, सत्चारित्र्य, सत्य वचन, सत्य सत्संग या सर्व बाबी विधायक गुणात्मक असून मानवी जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. सत्याचा मार्ग म्हणजे धर्माचा मार्ग, सत्य म्हणजेच धर्म होय. सत्याजवळ सदैव परमेश्वराचा वास असतो हे त्रिकालाबाधित सत्य आहे. असत्य, अनीती, अविचार, कुसंगती हे मार्ग व्यक्तीच्या जीवनात अत्यंत घातक व मारक असतात.

या मार्गावर चालणारी व्यक्ती अशा वर्तनाने काही काळ सुखावेल पण अनंत काळासाठी दुःखी व असमाधानी राहते हे विसरता कामा नये. असत्य मार्ग सदैव वाईटच असतो. या मार्गाचा अवलंब केल्यास अनंत काळापर्यंत दुःखद यातना भोगाव्या लागतात. यामुळे माणूस दुःखाच्या खाईत लोटला जातो. सत्य मार्ग स्वीकारणाऱ्याचा कैवारी निश्चितपणे ईश्वर असतो. सत्याचे आचरण केल्याने माणसाचे हितच होय, तर असत्य मार्गाचे फळ दुःखदायक व पीडादायक होय.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाचक पत्रे

### देव-देवतांची दिवाळी

कार्तिक शुक्ल एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते. कार्तिक शुद्ध एकादशी म्हणजे प्रबोधिनी एकादशी. या दिवशी श्री विष्णू झोपेतून जागे होतात आणि चातुर्मास संपतो. या दिवशी बळीच्या राज्यातून श्रीविष्णू आपल्या मूळ स्थानी परत आले अशीही मान्यता आहे. या दिवसात बाळकृष्ण आणि तुळशीचा विवाह करतात. त्यानंतर लग्नाचे मुहूर्त निघायला लागतात. या महिन्यात तुळशीची लागवड करतात.



कार्तिक पौर्णिमेला दिव्यांचा उत्सव साजरा केला जातो. देव दीपावलीच्या दिवशी वाराणसीत गंगेच्या तीरावर लाखो दिवे प्रज्वलित केले जातात. पुण्य संचय करण्यासाठी या दिवशी गंगा नदीत स्नान करतात आणि संध्याकाळी नदीत दीपदान करतात. तेव्हा जणू सर्व देवता आकाशातून पृथ्वीवर अवतरल्या आहेत असा भास निर्माण होतो. या दिवशी वाराणसीचे सर्व घाट दिव्यांनी उजळलेले दिसतात, हे रम्य दृश्य पाहण्यासाठी दरवर्षी देश-विदेशातून लोक वाराणसीला येतात.

देव दीपावळीला त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हणतात. कारण प्राचीन काळी भगवान शिवाने या तिथीला त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. त्याचे प्रतीक म्हणून त्रिपूर जाळून काकडा लावून आरती करतात. देव दीपावलीचा संबंध केवळ भगवान शिव यांच्यासोबत नसून भगवान विष्णूशीही आहे. असे मानले जाते की कार्तिक पौर्णिमेला भगवान विष्णूने मत्स्यावतार घेतला होता. या दिवशी भगवान कृष्णाने दिव्य रासलीला केली होती अशी मान्यता आहे. या शुभ दिवशी रासलीला कार्यक्रम आयोजित केले जातात. या उत्सवासाठी पुरीचे जगन्नाथ मंदिर, आणि इतर सर्व राधाकृष्ण मंदिरांमध्ये, संपूर्ण कार्तिक महिन्यात पवित्र व्रत पाळले जाते. भगवंताची निस्सीम भक्ती करून त्याच्याशी एकरूप होता येत, असे शिकवणारी रासलीला आहे.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग, छत्तीसगड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### अखिल भारतीय पेशवा संघटनेतर्फे ९ नोव्हेंबरला दहावा मोफत वधू-वर मेळावा

**परभणी,/प्रतिनिधी :** अखिल भारतीय पेशवा संघटनेतर्फे आयोजित दहावा मोफत वधू-वर मेळावा रविवार ९ नोव्हेंबर रोजी नांदखेडा रस्त्यावरील गंगा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन बंडू नाना सराफ यांच्या हस्ते होणार आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सचिन वाडे पाटील, स्वागताध्यक्ष म्हणून दीपक कासांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राहुल आंबेगावकर, नरहरी शास्त्री एरंडेश्वरकर, योगेश जोशी (सोनपेठकर), सुरेंद्र नेब, व्यंकटेश शर्मा, लक्ष्मीकांत दडके, धनंजय नारळे, मोरेश्वर मार्डीकर, संतोष जोशी, विजय काजे, काशीनाथ चांदकर, संदेश देशपांडे आणि विवेक जोशी आदींची उपस्थिती राहणार आहे.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विशाल जोशी, प्रदीप जोशी, रोहीत कनकदंडे, नागनाथ नरळदकर, कृष्ण कनकदंडे, आनंद रामपुरकर, शिवाजी पाटोदाकर, पराग चौधरी, राम शास्त्री, शिवाजी भाले, रमाकांत जोशी, शंतनु जोशी, सखाराम जोशी, महेश देशमुख, पराग चौधरी हे परिश्रम घेत आहेत. दरम्यान, या मेळाव्या करीता नोंदणीची वेळ सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ठेवण्यात आली असून या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या सर्व इच्छुकांनी वेळेत नोंदणी करून या सामाजिक उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### तर महाविद्यालयीन स्पर्धेत राजीव गांधी कृषी महाविद्यालयाचे यश : कबड्डीत विजेतेपद, तर व्हॉलीबॉल स्पर्धेत पटकावले उपविजेतेपद

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील राजीव गांधी कृषी महाविद्यालयाच्या मुलींनी आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत कबड्डीत विजेतेपद, तर व्हॉलीबॉल स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धांचे आयोजन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात करण्यात आले होते.

कबड्डी स्पर्धेत एकूण १४ संघांनी सहभाग नोंदविला होता. राजीव गांधी कृषी महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने दमदार खेळ सादर करत सुवर्णपदक मिळविले. संघात कर्णधार कोमल पंगनवाड, धनश्री देशमुख, रोहीणी भोरपे, श्रद्धा कोल्हे, श्रद्धा बोरकर, निकीता राठोड, निकीता आव्हाड आणि शिवकन्या पवार यांचा समावेश होता.

व्हॉलीबॉल स्पर्धेतही महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद मिळविले. या संघात कर्णधार कु. श्वेता पाटील, कोमल पंगनवाड, एश्वर्या मरकोले, सिद्धी देवकते, संध्या शिंदे, धनश्री देशमुख, निकीता राठोड, रोहीणी भोरपे आणि दुर्गा सरकटे यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. लक्ष्मीताई देशमुख, सचिव रवीराज देशमुख आणि प्राचार्य डॉ. डी. बी. पवार यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनीही खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. अभिजीत कंडेरे यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

### वृक्षारोपणासह संवर्धनासाठी समाजाने पूढे यावे- पो.नि.मांजरमकर

**परभणी,/प्रतिनिधी :** वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनासाठी समाजाच्या सर्वच स्तरातून पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे, असे मत नवा मोंढा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी व्यक्त केले.

येथील यश क्रीडा मंडळाच्या वतीने आज बुधवार ५ नोव्हेंबर रोजी श्री गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त सुपर मार्केट परिसरातील नवा मोंढा पोलिस स्टेशनलगत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या ठिकाणी अनेक दिवसांपासून नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याने परिसर अस्वच्छ झाला होता. मंडळाचे अध्यक्ष गौतम भराडे यांनी पुढाकार घेत हा परिसर स्वच्छ करून तेथे वृक्षारोपणाचा उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पो.नि. मांजरमकर, रिपाईचे राज्य सरचिटणीस डी. एन. दाभाडे, मनसे नेते सोनू लाहोटी, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, तसेच परभणी जिल्हा कल्चरल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुनील तुरुकमाने आणि राहुल घनसावंत उपस्थित होते. पुढे बोलतांना मांजरमकर म्हणाले, वृक्षतोडीमुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत असून, त्यामुळे जागतिक तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. जग एका नव्या संकटाला सामोरे जात आहे. मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित ठेवायचे असेल, तर प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. या कार्यासाठी समाजाच्या सर्वच स्तरातून पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. यश क्रीडा मंडळाने वृक्षारोपणासारखा स्तुत्य उपक्रम राबवून पर्यावरण रक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात जागरूकता निर्माण होऊन पर्यावरण संतुलन राखण्यास मदत मिळेल, असेही ते म्हणाले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या झाडांचे रोपण करण्यात आले. यश क्रीडा मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# आपदग्रस्तांसाठी ९१८.७२ कोटी रुपये मदत मंजूर : शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करणे सुरु : जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी-** अतिवृष्टी, पूरस्थिती तसेच रब्बी हंगामातील मशागतीसाठी राज्य सरकारने शासन निर्णयाप्रमाणे ९१८.७२ कोटी रुपयांची मदत मंजूर केली असून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये ही रक्कम जमा करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.



परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मधील अतिवृष्टी, पूरस्थिती तसेच रब्बी हंगामातील मशागतीसाठी राज्य सरकारने भरीव आर्थिक मदत मंजूर केली आहे. जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केलेल्या अहवालाच्या आधारे, शासनाने विविध निर्णय निर्गमित करून शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट मदत जमा करण्यास मान्यता दिली आहे, असे चव्हाण यांनी नमूद केले. शासन निर्णयांप्रमाणे एकूण ९१८.७२ कोटींची मदत मंजूर करण्यात आली असून, पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये ही रक्कम जमा करण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

शासन निर्णय क्र. २३५/खापा -७, दि. १८ सप्टेंबर २०२५ (महिने जून ते ऑगस्ट २०२५ अतिवृष्टी) बाधीत खातेदार २, ३८, ५३० यांच्यासाठी सरकारने १२८.५५ कोटी रुपयांची रक्कम उपलब्ध केली आहे. शासन निर्णय क्र. २३५/खापा -१२, दि. १६ ऑक्टोंबर २०२५ (सप्टेंबर २०२५ अतिवृष्टी क्षेत्र ० ते २ हेक्टर) बाधित खातेदार ४,३९,२९७ शेतकऱ्यांना २४५.६४ कोटी रुपयाची रक्कम शासनाने उपलब्ध केली आहे. शासन निर्णय क्र. २३५/खापा -१५, दि. २० ऑक्टोंबर २०२५ (सप्टेंबर २०२५ अतिवृष्टी क्षेत्र २ ते ३ हेक्टर) बाधित खातेदार ३९, ४५२४९.४२ शेतकऱ्यांना व शासन निर्णय क्र. ३९८/खापा -२, दि. ०४ नोव्हेंबर २०२५ परभणी विभाग) खातेदार ४, ३९, २९७ शेतकऱ्यांना ४९५.११ कोटी रुपयांची रक्कम असे एकूण ९१८.७२ कोटी रुपयांची रक्कम प्राप्त झाली आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे मार्गदर्शन...

ज्यांनी आधारकार्ड, फार्मर आयडी कार्ड व इतर आवश्यक माहिती दिली आहे, अशा शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत रक्कम थेट जमा होत आहे. ज्यांच्या खात्यावर रक्कम जमा झालेली नाही, त्यांनी तात्काळ ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून शासनाची मदत त्यांच्या खात्यावर जमा होऊ शकेल. सामायिक खात्यांच्या बाबतीत, कोणत्या खातेदाराच्या नावावर मदत जमा करायची याबाबत लेखी संमतीपत्र व आवश्यक कागदपत्रे सादर करावीत संबंधित गावकामगार तलाठी/ ग्राम महसूल अधिकारी, तहसीलदार कार्यालयात संपर्क साधावा. खाते क्रमांक, आधार कार्ड किंवा फार्मर आयडी मध्ये विसंगती असल्यास, संबंधित शेतकऱ्यांनी खातरजमा करून माहिती दुरुस्त करावी, जेणेकरून शासन मदत सत्वर जमा होऊ शकेल. जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित तालुका कृषी अधिकारी, बँक अधिकारी तसेच सेतू केंद्र शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. शासनाची ही मदत कोणत्याही मध्यस्थांशिवाय थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

## राज्यातील आठही पक्ष जनतेला न्याय देऊ शकले नाही - करुणा मुंडे :

स्वराज्य शक्ती सेनेतून वंचित घटकांना सक्षम पर्याय देण्याची ग्वाही

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील सत्ताधारी व विरोधी मिळून तयार केलेले प्रमुख आठ राजकीय पक्ष मागील ७० वर्षांपासून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला न्याय देण्यात अपयशी ठरले असून, जनतेच्या सर्वसाधारण समस्या अनपेक्षितपणे राहिल्या आहेत, असा आरोप स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष करुणा मुंडे यांनी परभणीत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून केला.



मुंडे म्हणाल्या की, ग्रामीण तसेच शहरी भागात आजही लोकांना नाल्या, कचरा व्यवस्थापन, रस्ते आणि पिण्याचे पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी सतत संघर्ष करावा लागत आहे. सत्तांतराच्या या खेळात महायुती व महाविकास आघाडीच्या घोटाळ्यांना एकमेकांद्वारे लपवण्याचा प्रयत्न चालू आहे आणि परिणामी सर्वसामान्य नागरीक सुविधांपासून वंचित राहत आहेत. राज्याला आता खऱ्या अर्थाने सक्षम व प्रामाणिक राजकीय पर्यायाची गरज आहे. स्वराज्य शक्ती सेना या पक्षाच्या माध्यमातून आम्ही वंचित घटकांना न्याय देण्याचे काम करू, अशी ग्वाही मुंडे देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार आहोत, असे त्या म्हणाल्या.

## पाथरीत माजी नगराध्यक्षांसह अनेकांचा राकाँत प्रवेश; पालिका निवडणूका समोर असतांना राजकीय बदल

**पाथरी,/प्रतिनिधी-** न प निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी नगराध्यक्षा सह काँग्रेसच्या अनेक माजी नगरसेवक आणि माजी आ दुर्रानी यांच्या अनेक समर्थकांनी आज गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी राज्याचे उप मुख्यमंत्री ना अजीत दादा पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात सकाळी १० वा. पक्ष प्रवेश केला. हा पक्ष प्रवेश माजी आ दुर्रानींना मोठा धक्का मानला जात आहे. निवडणुक आयोगाने न प निवडणुका नुकत्याच जाहिर केल्या. पाथरीत मागिल काही महीण्या पासुन न प निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय हालचालींना प्रचंड वेग आलेला दिसत असतानाच आज गुरुवारी पाथरीचे आ राजेश दादा विटेकरांनी माजी आ बाबाजानी दुर्रानी यांना जबरदस्त धक्का देत दुर्रानी यांचे अनेक खंदे समर्थक गळाला लावत न प निवणुक ताकदीने लढवणार आणि जिंकणार पण असा निर्धार फोन वरुन बोलताना व्यक्त केला. या सर्व घडामोडीत संजय कुलकर्णी यांनी महत्वाची भुमिका निभावली. आज प्रवेश केलेल्या मध्ये माजी नगराध्यक्ष एम ए मोईज अन्सारी मास्टर यांच्या सह. पदाधिकारी,अनिस फारुकी काँग्रेस पदाधिकारी,सईद अन्सारी माजी नगरसेवक, शिवसेना, शाखेर सिद्दिकी माजी नगरसेवक, शिवसेना, डॉ. तौफिक शेख अमजीद अन्सारी, रहीम अन्सारी,वली पाया कुरेशी शिवसेना, माजी नगरसेवक,वाजेद बेग काँग्रेस, कृष्णा गिराम शिवसेना,चंद्रकांत हारकळ शिवसेना, विठ्ठल धोरात भाजपा,आरिफ एजाज कादरी काँग्रेस,तज्जमुळ फारोखी काँग्रेस,शापान फारुख फारुखी काँग्रेस, शहानवाज फारोखी बीजेपी,एजाज सिद्दिकी शिवसेना,सय्यद सद्दाम काँग्रेस,अतीम फुळवरे शिवसेना, नाना तुपस मिंद्रे काँग्रेस,अरुण वाकडे काँग्रेस,चंद्रसिंग नाईक काँग्रेस,आकाश क्षीरसागर बीजेपी,सागर कदम,जमीर पटेल,शेख अशफाक, नाजिम कुरेशी,कालु कुरेशी, बिट्टू कुरेशी यांचा यात सामावेश असुन अजून काही मोठे मासे गळाला लागतील अशी चर्चा शहरात होत आहे.



### पूर्णा न.प.साठी बोथरीकर नियुक्त

**पूर्णा/प्रतिनिधी** -नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी निर्वाचन अधिकारी म्हणून पूर्णाचे तहसीलदार माधवराव बोथीकर यांची शासनाने नेमणूक केली असून येत्या दहा तारखेपासून निवडणुकीची प्रत्यक्ष प्रक्रिया तहसील कार्यालय पूर्णा येथे सुरू होणार आहे . या निवडणूक साठी निर्वाचन अधिकारी व सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याची नेमणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निर्वाचन अधिकारी म्हणून पूर्णाचे तहसीलदार माधवराव बोथीकर यांची नेमणूक करण्यात आली आहे तर सहाय्यक निर्वाचन अधिकारी म्हणून नायब तहसीलदार प्रशांत थारकर तसेच मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांची नेमणूक करण्यात आली.

## नगराध्यक्षपदाचा ''चेहरा'' कोण? जिंतूरात राजकीय पक्षाच्या हालचाली वेग ; इच्छुकांचीही मोर्चे बांधणी !

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर नगरपरिषद निवडणुकीची घोषणा अद्याप झालेली नसली तरी राजकीय वातावरण तापू लागलेले आहे. स्थानिक राजकारणात पुन्हा एकदा सत्ता मिळवण्यासाठी प्रमुख पक्ष भाजप ,काँग्रेस, शिवसेना , (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि ए आय एम आय एम यांनी नगराध्यक्ष पदासाठी योग्य लोकप्रिय आणि जिंकणारा चेहरा शोधण्याची मोहीम सुरू केली आहे.

निवडणुकीसाठी काही स्वतंत्र उमेदवारांची तयारी गुपचूप सुरू आहे .सोशल मीडियावर प्रचार मतदार सरु आहे सर्वेक्षणी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकामुळे जिंतूरात राजकीय तापमान वाढत आहे आगामी काही दिवसात प्रत्येक पक्षांचा नगराध्यक्षांचा चेहरा जाहीर होऊ शकतो भाजपाकडून माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांचे नाव फायनल झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

तर शिवसेना (उबाठा) गटांची सुरेखा शेवाळे टाले ह्याही नगर अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवणार असल्याची त्यांनी घोषित केले आहे तर २०१७ च्या नगरपालिका निवडणुकीत इच्छुक असलेले काही उमेदवार बंड करण्याच्या तयारी दिसून येत आहेत.

भाजपकडून सक्रियपणे रणनीती आखणी

सत्तेचा अनुभव आणि संघटन शक्ती यावर विश्वास ठेवत भाजपकडून विद्यमान माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख मागील निवडणुकीतील मतदारसंघाचा कल विकास कामांची यादी आणि कार्यकर्त्यांचा पाठिंबा या सर्वच घटकांचा विचार करून अंतिम उमेदवार ठरलं असल्याची संकेत मिळत आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस कडून नव्या उमेदवारांवर भर

राष्ट्रवादी काँग्रेस कडून जुन्या कार्यकर्त्यांचा अनुभव आणि तरुण कार्यकर्त्यांचे ऊर्जा यांचा समन्वय साधण्यावर भर देण्यात येत आहे. पक्षांच्या तालुका आणि जिल्हा पातळीवरील नेत्यादरम्यान उमेदवारांनी निवडणुकीसाठी बैठका सुरू आहेत. स्थानिक जनतेत विश्वासहार्य प्रतिमा असलेला आणि विकास कामांचा कार्यक्रम घेऊन पुढे येणारा राष्ट्रवादीचा उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस कडून पुढे करण्याचा विचार आहे.

एमआयएम, मजलीस-ए-इंकलाबे मील्लत व शिवसेने सह कार्यकर्त्यांची चाचपणी

शिवसेनेकडून जनतेची थेट संपर्क असणाऱ्या तरुण चेहऱ्यांना प्राधान्य दिले जात असले तरी गाव पातळीवर बैठक आणि कार्यकर्त्यांच्या मतांची नोंद घेतली जात आहे. तर शिवसेनेच्या जिल्हा संघटक सुरेखा शेवाळे टाले या मात्र कंबर कसून तयार दिसून येतात. तर याच निवडणुकीत एएमआयएम व मजलीस-ए-इंकलाबे मील्लत व आणखीनही मुस्लिम पार्टी आपला नवीन चेहरा निवडण्याच्या तयारीत दिसून येतात.

भारतीय जनता पक्षाकडून प्रताप देशमुख यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली असून शिवसेना (उबाठा) सुरेखाताई शेवाळे टाले ह्या देखील तयारीत आहेत व राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे सबिया बेगम कपिल फारुकी, बाळासाहेब भांबळे, इस्माईल पैलवान हे देखील इच्छुक आहे.

## बळीराजा साखर कारखान्याचा १२वा गळीत हंगाम मोळीपुजन शुभारंभ संपन्न

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** बळीराजा साखर कारखान्याचा १२वा गळीत हंगाम मोळीपुजन शुभारंभ दि.०६/११/२०२५ वार गुरुवार रोजी स. ०९:३० वाजता कारखान्याचे कार्यकारी संचालक अजय शिवाजीराव जाधव यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमास मान्यवर, ऊस उत्पादक शेतकरी, पत्रकार तसेच कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

सन २०२५-२६ गळीत हंगामात कारखान्याने ११ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्याकडे ११२५६ हेक्टर सभासदाच्या ऊसाची नोंद आहे. सभासदांचा ऊस गाळप झाल्यानंतर उर्वरित बिगर सभासद यांचा ऊस गाळपासाठी बळीराजा साखर कारखाना आणणार आहे. आमच्या कारखान्याला हंगाम २०२५-२६ मध्ये शासनाच्या धोरणाप्रमाणे व प्रमाणे दर दिला जाईल, यावर्षी कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन ३५०० वरून ७५०० मे. टन करण्यात आलेली आहे. तसेच कारखान्याची ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा, कुशल कर्मचारी वर्ग या गळीत हंगामासाठी तत्पर असुन बळीराजा कारखान्यास जास्तीत जास्त शेतक-यांनी आपला ऊस देऊन कारखान्यास सहकार्य करावे. गळीत हंगाम २०२५-२६ यशस्वीरीत्या पार पाडुन ११ लाख मे. टनाचे ऊस गाळप करणेचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी व वाहतुक ठेकेदार तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार यांनी सहकार्य करावे. असे आवाहन अजय जाधव यांनी केले.




यावेळी मा. नगरअध्यक्ष उत्तमराव कदम, सुशिल वरपुडकर, मारोतराव बखाल, डॉ. वाघमारे, चांदोजी बोबडे, गोंवद चव्हाण, राजेश दुत, नामदेव जाधव, डॉ. गुलाब इंगोले, व्यंकटराव पारवे, आनंद आजमेरा, दसरथ भोसले, नागनाथ शिंदे, निवृत्ती सोलव, गंगाधर धवन, प्रताप बखाल, बाबुराव बोबडे व मान्यवर उपस्थित होते. गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमास कारखान्याचे संचालक दिनकर जाधव, जनरल मॅनेजर भगवान मोरे, वर्क्स मॅनेजर तुकाराम सुरवसे, चिफ केमिस्ट किरण मगर, मुख्य शेतकी अधिकारी रमेश पौळ, इलेक्ट्रीक मॅनेजर नितीन गणोरकर, ऊस पुरवठा अधिकारी विनायक क-हाळे, रामजी शिंदे, बालासाहेब तिडके, केन अकौंटट रामेश्वर लंवदे, सुरक्षा अधिकारी विनायक कदम, टाईम किपर गणेश सुर्यवंशी, केनयार्ड सुपरवायजर राजेंद्र मोगरगे महेश हेबळे तसेच कारखान्यातील सर्व विभागातील विभाग प्रमुख, कर्मचारी व शेतकरी, ऊस तोड वाहतुक ठेकेदार उपस्थित होते. सुत्रसंचलन माधव मोहीते यांनी केले आभार जगदीश जोगंदड यांनी मानले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऑनलाईन कामाच्या आमिषाने फसवणूक : बनावट आयडी तयार करून कर्ज घेतले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

घरबसल्या ऑनलाईन काम देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पवन जाधव (रा. लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव) याने फिर्यादी विलास मधुकर देशमुख (वय ४२, रा. पोहनेर, ता. व जि. धाराशिव) यांचा विश्वास संपादन केला. त्याने फिर्यादीस सांगितले की, कंपनीचे घरबसल्या ऑनलाईन काम आहे, त्यासाठी इंस्टाग्रामवर कंपनीचा आयडी काढावा लागेल. असे सांगून त्यांना विश्वासात घेतले.

यानंतर आरोपीने बजाज फायनान्स धाराशिव येथे बनावट आयडी तयार करून २५ हजार ९७५ रूपयांचे कर्ज मंजूर करून घेतले आणि फिर्यादीची फसवणूक केली.

या घटनेबाबत फिर्यादी विलास देशमुख यांनी दि.४ नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी आरोपी पवन जाधव याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### भारतीय किसान संघातर्फे जनावरांसाठी होमिओपॅथी औषधांचे वाटप

**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

भारतीय किसान संघ शेतकऱ्यांच्या जनावरांच्या मदतीसाठी पुन्हा होमिओपॅथीच्या औषधांचे किटचे तुळजापूर तालुक्यातील किलज, जवळगा, वडगाव, सलगर (दि.), काक्रंबा येथील शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. भारतीय किसान संघाने यापूर्वी कोल्हापूर सांगलीच्या महापुरामध्ये जनावरांसाठी होमिओपॅथी औषधे उपलब्ध करून दिली होते. या औषधांच्या किटची किंमत ३२० रुपये आहे. भारतीय किसान संघाकडून ते विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. औषधांच्या वितरण भारतीय किसान संघ जिल्हा अध्यक्ष नितीन घुले वाशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तुळजापूर तालुकाध्यक्ष अभिजित पांढरे सिंदफळ, अमोल सोमवंशी, प्रल्हाद सगर किलज व कार्यकर्ते उपस्थित होते.



#### नंदकुमार तेललवार यांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळा संपन्न

**अणदूर, दि.५ नोव्हेंबर -**

जवाहर माध्यमिक व उच्च विद्यालय, अणदूर येथे व्हर्टिकल्चर विभागातील शिक्षक नंदकुमार तेललवार यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, आण्णा महाराज घोडके, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, सुरेश ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. तेललवार यांचा सपत्नीक सन्मान, भरपेहराव, आहेर व विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती भेट देऊन करण्यात आला. कार्यक्रमात सुरेश ठोंबरे, देवदत्त पाटील, गोपाळ कुलकर्णी, विजय तेललवार यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. तेललवार यांनी स्व. सि. ना. आलुरे गुरूजींप्रती कृतज्ञता व्यक्त करत, शिक्षण क्षेत्रातील अनुभव मांडले. अध्यक्षीय समारोपात रामचंद्र आलुरे यांनी त्यांची निष्ठा, प्रामाणिकपणा व परोपकारी वृत्ती यांचे कौतुक करून, शिक्षक कधीही माजी होत नाही; तो समाजाचा मार्गदर्शक असतो, असे सांगितले. कार्यक्रमास बालाजी घुगे, भागवत स्वामी, कोळी, बाशा शेख यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी केले तर आभार सिध्देश्वर मसुते यांनी मानले.



#### डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी

**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**

फलटण येथील महिला आरोग्य अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या व्यक्तींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशन नळदुर्ग, जळकोट, अणदुर व इटकळ यांच्या वतीने नळदुर्ग पोलिस ठाण्याचे निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, काही लोकांच्या मानसिक छळामुळे डॉ. मुंडे यांनी आत्महत्या केली. दोषींवर त्वरित गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर डॉ. सिद्रामप्पा खजुरे, डॉ. व्यंकटेश घुगे, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. अमरदीप कंदले यांच्यासह एकूण ३० डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### वाशी तालुक्यात शिंदे गटात खळबळ; काही कार्यकर्त्यांच्या पक्षबदलाच्या चर्चेला उधाण?

# धनुष्यबाण सोडून ‘मशाल’ हाती घेण्याची शक्यता?

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.५ नोव्हेंबर -**








वाशी तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतसे राजकीय वातावरण तापू लागले आहे. सर्वच राजकीय पक्ष आता क्शन मूडमध्ये असून उमेदवार निश्चिती, मतदारसंघनिहाय गणिते आणि आंतरिक गटबाजी या सगळ्यामुळे तालुक्यातील राजकारण चांगलेच रंगत आले आहे. पक्षनिहाय बैठका, कार्यकर्त्यांच्या हालचाली, प्रचाराच्या तयारीला सुरुवात झाली आहे.

सोशल मीडियावर अनेक ठिकाणी भावी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि सभापती पदाचे इच्छुक कार्यकर्ते सक्रिय होताना दिसत आहेत.

कार्यकर्त्यांकडून नेत्यांच्या भेटीगाठी, तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न आणि शक्तिप्रदर्शनाचा खेळ सुरू झाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा मतदारसंघात सुद्धा राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. जरी युतीचे अधिकृत चित्र स्पष्ट नसले तरी महायुती आणि महाविकास आघाडीतील काही नेते एकाच मंचावर आल्याने चर्चेला उधाण आले आहे.

पक्षांतर्गत असंतोष, कुरघोडी आणि संभाव्य पक्षप्रवेशाच्या हालचाली यामुळे स्थानिक राजकारणात गती निर्माण झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार वाशी तालुक्यातील शिंदे गटातील काही नेते आणि कार्यकर्ते धनुष्यबाणाची साथ सोडून मशालच्या दिशेने वाटचाल करू शकतात.

काही ठिकाणी या कार्यकर्त्यांचे विरोधी पक्षांशी संपर्क वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे. यामुळे शिंदे गटाला तालुक्यात खिंडार पडण्याची शक्यता निर्माण झाली असून पुढील काही दिवसांत काही राजकीय पक्षप्रवेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> वाशी तालुक्यात शिंदे सेनेत कोणतेही मतभेद नाहीत. सर्व कार्यकर्ते पक्षाशी निष्ठावान आहेत आणि एकदिलाने पक्षाच्या मागे उभे आहेत. काही जण स्वार्थासाठी वेगळा विचार करू शकतात पण त्यातून पक्षाला धक्का बसत नाही. आमचा विश्वास जनतेवर आहे, तिकीटावर नाही. शिंदे सेना वाशी तालुक्यात मजबूत आहे आणि पुढील निवडणुकीत आपली ताकद दाखवेल. काही लोक अफवा पसरवून गोंधळ निर्माण करत आहेत, पण आम्ही त्यांच्या दबावाला बळी पडणार नाही.
>
> **- सत्यवान गपाट,** तालुका प्रमुख, शिंदे सेना वाशी

वाशी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या वेळी राज्याच्या लक्षवेधी निवडणुकांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे.

कारण येथे सत्ताधारी आणि विरोधक दोघेही ताकदीने मैदानात उतरणार आहेत. पक्षांतर्गत असंतोष, उमेदवारांची लढाई आणि कार्यकर्त्यांची धावपळ यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण अजून अधिक तापले आहे.

दरम्यान, वाशी तालुक्यात शिंदे सेनेचा कोणता नेता खरोखरच पक्ष सोडून जाणार आणि कोण ठामपणे बाणाशी निष्ठा ठेवणार हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## केंद्रीय पथकाकडून धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी

**पूरबाधित शेतकऱ्यांशी थेट संवाद... नुकसानीचा अहवाल केंद्र सरकारकडे जाणार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती, जनावरं आणि मालमत्तेचे नुकसान झाले. या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारच्या पथकाने आज (५ नोव्हेंबर) जिल्ह्याचा दौरा करून पूरग्रस्त भागाची पाहणी केली आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

या केंद्रीय पथकाचे नेतृत्व ऊर्जा मंत्रालयाचे उपसंचालक करण सरीन यांनी केले. पथकात वित्त मंत्रालयाचे उपसचिव कंदर्प पटेल, ग्रामीण विकास मंत्रालयाचे उपसचिव अभिषेक कुमार राज, आणि जलशक्ती मंत्रालयाचे संचालक सतेंद्र प्रताप सिंग यांचा समावेश होता. पथकाने परंडा तालुक्यातील खासगाव व वागेगव्हाण या गावांना भेट दिली.

खासगाव येथे पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकरी दत्तात्रय सातपुते आणि प्रदीप शहा यांच्या शेतजमिनीची पाहणी करण्यात आली. उल्फा नदीच्या पूरामुळे शेतीचे नुकसान झाल्याची माहिती ग्रामस्थांनी पथकाला दिली. तसेच पथकाने नदीपात्र आणि पुलाची प्रत्यक्ष पाहणी केली.

यानंतर पथकाने वागेगव्हाण गावात जाऊन नुकसान झालेल्या शेती व घरांचे निरीक्षण केले. तसेच सीना नदीकाठावरील ग्रामस्थांकडून पुरपरिस्थितीची माहिती घेतली. या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, भूम उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, कृषी विभागाचे प्रभारी जिल्हा अधीक्षक महादेव आसलकर, वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता आडे, तहसीलदार मनिष काकडे आणि गटविकास अधिकारी मोहन राऊत उपस्थित होते.

भेटीनंतर परंडा येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हाधिकारी पुजार यांनी पथकास जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. केंद्रीय पथक जिल्ह्याच्या नुकसानीचा संपूर्ण अहवाल तयार करून केंद्र सरकारकडे सादर करणार असल्याचे सांगण्यात आले.

## बेकरी मशिनरीच्या नावाखाली साडेबारा लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

येथील एका महिलेला बेकरी मशिनरी पुरविण्याचे आमिष दाखवून तब्बल १२ लाख ५० हजार रूपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी बिजली मेहतो (रा. सोलापूर) याने फिर्यादी भाग्यश्री विठ्ठल लांडगे (वय २६, रा. पाडोळी, ता. धाराशिव) यांचा विश्वास संपादन करून त्यांना बेकरी मशिन पुरवण्याचे आश्वासन दिले. आरोपीने यासाठी २३ मे रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत फिर्यादीकडून आरटीजीएस आणि फोनपे द्वारे एकूण १२ लाख ५० हजार रूपये इतकी रक्कम घेतली. मात्र, पैसे घेतल्यानंतरही त्याने कोणतीही मशिनरी न देता गायब झाला.

या फसवणुकीबाबत फिर्यादी भाग्यश्री लांडगे यांनी ४ नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी बिजली मेहतो याच्याविरुद्धगुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## परंड्यात निर्दयपणे जनावरांची कत्तल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ नोव्हेंबर -**

परंडा शहरातील सिकलकर गल्ली परिसरात गोवंशीय जनावरांची निर्दयपणे कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपशान रशीद कुरेशी (वय २०), मोहम्मद युनुस मोहम्मद इब्राहिम बागवान (वय ३६, दोघे रा. इंदापूर, जि. पुणे, ह.मु. परंडा) आणि फाजील सौदागर (रा. परंडा) यांनी ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता परंडा-कुर्डुवाडी रस्त्यालगत सिकलकर गल्ली येथे गोवंशीय जनावरांची निर्दयपणे कत्तल केली.

> **१५६५ किलो मांस जप्त**

यावेळी पोलिसांना घटनास्थळी १५६५ किलो गोमांस, दोन लोखंडी चाकू असे एकूण ३ लाख १३ हजार रुपयांचे साहित्य मिळून आले. या कारवाईनंतर पोलिसांनी संबंधित तिघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

परंडा पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे.

## होळकर चौकातील सभा ठरणार व्यापाऱ्यांची डोकेदुखी!

**निवडणुकीच्या सभांमुळे पुन्हा ठप्प व्यापार... कळंबच्या व्यापाऱ्यांमध्ये नाराजी... दिवाळीनंतर गती घेतलेला व्यापार पुन्हा मंदावणार?**



**सोलापूर तरुण भारत विशेष...**

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.५ नोव्हेंबर -**

उसनवारी, कुणी रान विकून, तर कुणी बँक किंवा सावकाराकडून कर्ज घेऊन कळंब शहरात मोठ्या थाटामाटात दुकाने सुरू केली. मात्र ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांना पार्किंगची सोय नसल्याने वाहनांची गोंधळलेली वर्दळ आणि पावसाळ्यातील मंदीमुळे व्यापाऱ्यांचे हाल झाले. महिनोनमहिने दुकानाचे भाडेही निघत नव्हते. आता दिवाळीनंतर कुठे व्यापार पूर्ववत सुरू झाला होता, तेवढ्यातच निवडणूक लागल्याने व्यापाऱ्यांसमोर पुन्हा अडचणी निर्माण झाल्या आहेत.

कळंब नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षासह २० नगरसेवक निवडण्यासाठी मतदान होणार आहे. शहरातील होळकर चौक ही गजबजलेली बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असून, कोणताही कार्यक्रम असो वा उत्सव - येथेच मोठमोठी मंडपे टाकून सभा घेतल्या जातात. त्यामुळे व्यापार ठप्प होतो आणि नुकसान होते.

गेल्या काही महिन्यांपासून सततच्या पावसामुळे व्यापाऱ्यांचे आधीच मोठे नुकसान झाले आहे.

आता निवडणुकीच्या प्रचारसभांमुळे सकाळ-दुपार-संध्याकाळ दुकाने बंद ठेवण्याची वेळ येईल, अशी व्यापाऱ्यांची भीती आहे.

व्यापाऱ्यांची मागणी आहे की, प्रशासनाने सभा घेण्यासाठी मोकळ्या, सुटसुटीत जागांचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून बाजारपेठेतील व्यापारावर परिणाम होणार नाही. या समस्येकडे प्रशासन लक्ष देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> **नगरपालिका निवडणूक कार्यक्रम**
>
> **उमेदवारी अर्ज दाखल सुरवात दि.१० नोव्हेंबर २०२५ ते १७ नोव्हेंबर २०२५, उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा शेवट दि.२१ नोव्हेंबर, उमेदवारांना चिन्ह वाटप दि.२६ नोव्हेंबर, नगर परिषद निवडणूक दि.२ डिसेंबर, निवडणूक निकाल दि.३ डिसेंबर २०२५.**

## आ. प्रविण स्वामींचा उपक्रम : उमरगा नगर परिषदेचा ‘माझा वार्ड, माझी जबाबदारी’ उपक्रम राज्यासाठी आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ नोव्हेंबर -**





उमरगा नगर परिषदेने राबविलेला माझा वार्ड, माझी जबाबदारी हा अभिनव उपक्रम शहराच्या सर्वांगीण विकासासाठी वरदान ठरला आहे. आमदार प्रविण स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही योजना नागरिकांच्या सक्रिय सहभागातून उमरगा शहराला स्वच्छता, सुव्यवस्था आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने नेणारा आदर्श मॉडेल ठरत आहे.

या उपक्रमात शहरवासीयांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना प्राधान्य देत प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत. गटारींची नियमित स्वच्छता, रस्त्यांवरील साफसफाई, सार्वजनिक पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती, मोकाट जनावरांवर बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, आठवडी बाजाराचे नियोजन आणि पाणीपुरवठा योजनेतील त्रुटींवर तातडीने कार्यवाही, अशा अनेक बाबींमुळे शहराचे रूप पालटले आहे.

या योजनेचे सर्वात मोठे यश म्हणजे नागरिकांसाठी तयार करण्यात आलेला विशेष व्हॉट्सॲप ग्रुप. नागरिकांना आता कार्यालयीन चकरा मारण्याची गरज उरलेली नाही.

परिसरातील समस्या जसे की, रस्त्यावरचा कचरा, गटार तुंबणे, पाणी साचणे इत्यादींचे फोटो नागरिक थेट या ग्रुपवर पाठवतात, आणि दुसऱ्याच दिवशी संबंधित विभाग कार्यवाही करतो.

अलीकडेच झालेल्या अतिवृष्टीत पाणी घरात घुसल्याच्या अनेक तक्रारी या ग्रुपवर आल्या होत्या. नगर परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी तत्परतेने प्रतिसाद देत नागरिकांना मोठा दिलासा देत या उपक्रमाच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण ठरले.

या उपक्रमामुळे उमरगा शहरातील नागरिकांचा नगर परिषदेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

नगर परिषद कर्मचारी, पोलीस प्रशासन, महावितरण, आरोग्य विभाग, महामार्ग प्राधिकरण, पत्रकार, डॉक्टर आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी झाला आहे. पूर्वी आठवड्याभर लागणारी कामे आता एक-दोन दिवसांत पूर्ण होत आहेत, हे या योजनेचे यश मानले जात आहे.

उमरगा नगर परिषदेचे नेतृत्व, नागरिकांचा सहभाग आणि प्रशासनाची तत्परता या त्रिसूत्रीमुळे हा उपक्रम केवळ उमरगा पुरता मर्यादित न राहता जिल्हाभर आदर्श ठरत आहे.

या लोकसहभागाच्या पॅटर्नमुळे संपूर्ण लोकसभा मतदारसंघात स्वच्छता आणि सुशासनाच्या दिशेने नवा अध्याय सुरू होणार आहे.

> **जिल्हाभर विस्तार होणार...**
>
> माझा वार्ड, माझी जबाबदारी या उपक्रमाच्या यशाची दखल खासदार ओमराजे निंबाळकर यांनी स्वतः घेतली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा आणि नगरपंचायतींनी हा उपक्रम तातडीने राबवावा, अशा सूचना दिल्या आहेत.

> **समस्यांवर तोडगा; आमदारांचे सचिव ॲक्शन मोडमध्ये!**
>
> उमरगा शहरातील विविध नागरी समस्यांवर तातडीने तोडगा निघावा, यासाठी आमदारांचे सचिव शिवकांत पतगे यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. या ग्रुपवरील तक्रारींवर ते थेट संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत आहेत. मुख्याधिकारी तसेच विभागप्रमुखांना ही समस्या आजच मिटली पाहिजे अशा सूचना देत ते तातडीने कारवाईचे आदेश देत आहेत. परिणामी, अधिकाऱ्यांवर कामाचा दबाव निर्माण होत असून समस्यांचे निराकरण वेगाने होत आहे. शहरवासीयांच्या समस्या तत्काळ सोडविणारा हा ग्रुप आता शहराचा आधार ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# सरकारच्या दगाबाजीचं सत्य महाराष्ट्रासमोर आणणार : उद्धव ठाकरे

शिवसेना पक्षप्रमुखांचा धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा; शेतकऱ्यांशी थेट बांधावर जाऊन संवाद... शेतकऱ्यांना दिला धीर...







तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांच्या दौऱ्यावर आलेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी परांडा आणि भूम तालुक्यातील विविध गावांना भेट देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

परांडा तालुक्यातील शिरसाव येथे ग्रामस्थांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दात टीका केली. ते म्हणाले, बळीराजा आज आक्रोश करतोय, कारण सरकारनं त्याच्या भावनांशी खेळ केला आहे. या दगाबाजीचं सत्य महाराष्ट्रासमोर आणण्यासाठीच आम्ही आलो आहोत.

यानंतर ठाकरे यांनी भूम तालुक्यातील पाथरुड आणि उळूप गावांना भेट दिली. पाथरुड येथे त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्यांना धीर देत म्हणाले, विश्वासघातकी महायुती सरकार आणि त्यांच्या पोकळ आश्वासनांमुळे बळीराजा खचला आहे. पण आम्ही नुकसानभरपाई आणि कर्जमुक्ती मिळवून घेणारच. उळूप गावात ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची नुकसानीची पाहणी केली. ते म्हणाले, जितक्या वेदना या शेतकरी मायबापाला होताहेत, तितक्याच वेदना मुक्या जनावरांनादेखील होत आहेत. ही वेदना मिटवण्यासाठी शिवसेना एकजुटीने लढत राहील. या दौऱ्यादरम्यान शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना सचिव आ. मिलिंद नार्वेकर, खा. ओम राजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, आ. प्रविण स्वामी यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांच्या या दौऱ्यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य व आत्मविश्वास निर्माण झाला, असे चित्र जिल्ह्यात पाहायला मिळाले.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्षपदी प्रतापसिंह पाटील यांची नियुक्ती



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार पक्ष) च्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी प्रतापसिंह पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पाटील समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

या संदर्भात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नियुक्तिपत्र जारी केले आहे. पाटील यांनी पक्षासाठी दिलेल्या निष्ठावान, सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद आहे. या प्रसंगी महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे उपस्थित होत्या.

मागील काही काळापासून जिल्हा संघटनेत माजी जिल्हाध्यक्षांविरोधात नाराजीचे वातावरण होते. संघटनात्मक निर्णय घेताना पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतले जात आहेत, अशी तक्रार पक्षाकडे पोहोचली होती. या पार्श्वभूमीवर पक्षाने नव्या नेतृत्वावर विश्वास दाखवत पाटील यांच्या नियुक्तीस मान्यता दिली आहे. प्रतापसिंह पाटील हे धाराशिव जिल्ह्यातील एक समाजसेवी आणि कार्यकर्त्यांमध्ये स्थान असलेले व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीमध्ये सक्रिय भूमिका निभावली आहे. पक्षात फूट पडल्यावरही ते शरदचंद्र पवार यांच्या प्रति एकनिष्ठ राहिले असून, पक्ष बांधणी आणि कार्यकर्त्यांच्या समन्वयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## वॅगनर कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.५ नोव्हेंबर -

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर झालेल्या दुर्दैवी अपघातात अनुसया रघुनाथ लोहार (रा. बाबा कलेक्शन दुकानासमोर, येरमाळा) या महिलेला आपला जीव गमवावा लागला.

ही घटना दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ८.३० वाजता ज्ञानोदयोग ज्युनिअर कॉलेजजवळ घडली. अनुसया लोहार रस्ता ओलांडत असताना मारुती सुझुकी वॅगनर कार (क्र. एमएच २५ एएस १००२) या वाहनाच्या चालकाने अति वेगाने व निष्काळजीपणे गाडी चालवत पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात अनुसया लोहार या गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्यू पावल्या. या प्रकरणी प्रकाश रघुनाथ कळसाईत (वय ३३, रा. बाबा कलेक्शन दुकानासमोर, येरमाळा) यांनी येरमाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास येरमाळा पोलिसांकडून सुरू आहे.

## तेर येथील वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र विद्यार्थ्यांचा अर्चना पाटील यांच्या हस्ते गौरव

### प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

तेर गावातील वैद्यकीय शिक्षणासाठी (एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस) यावर्षी पात्र ठरलेल्या नऊ गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सौ. पाटील यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वैष्णवी काकासाहेब देवकते, श्रुती गोरोबा सुतार, ओंकार राजेंद्र धुमाळ, वैष्णव दत्ता बनसोडे, प्रणाली बबन कोकरे, आकाश अभिमान कोकरे, मयूर जितेंद्र दीक्षित, आरती नानासाहेब बीटे आणि श्वेता अभिमान राऊत यांचा समावेश आहे.





अर्चनाताई पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, तेर गावातील विद्यार्थ्यांची ही कामगिरी गावाच्या अभिमानाची बाब आहे.

त्यांच्या पुढील शिक्षणात कोणतीही अडचण आली, तर मी नेहमी मदतीस तयार आहे. तसेच, पुढील काळातही तेर येथील जे विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरतील, त्यांना कै. चंद्रकलादेवी पाटील जयंती निमित्त प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, अशीही त्यांनी घोषणा केली.

या उपक्रमासाठी गोरोबा पाडुळे, बालाजी पांढरे, सचिन देवकते, इंद्रजीत कोळपे, अनिल टेळे, भुजंग खांडेकर, रमेश लकडे यांनी पुढाकार घेतला.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये दत्ता देवळकर, श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, प्रा. सोमनाथ लांडगे, राम जवान, माधवी लकडे, बेद्रे, हनुमंत कोळपे, नवनाथ पसारे, सुधाकर फासे, अजित कदम, सुमेध वाघमारे, इर्शाद मुलाणी, राम कोळी, संजय लोमटे, काका माळी, बनसोडे, नानासाहेब बीटे, सोमनाथ फासे यांच्यासह आदींचा समावेश होता.

## एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचा सिद्धेश कात्रे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योग स्पर्धेसाठी निवड



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

डॉ.व्ही.के. पाटील शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थी सिद्धेश महादेव कात्रे याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योग स्पर्धा २०२५-२६ साठी निवड झाली आहे.

ही प्रतिष्ठित स्पर्धा वेल्स इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, चेन्नई (बंगळुरू केंद्र) येथे पार पडणार असून, या स्पर्धेसाठी सिद्धेशची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे मार्फत झाली आहे. निवड प्रक्रिया १७ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री विले पार्ले केळवणी मंडळ तंत्रज्ञान संस्था, धुळे येथे झालेल्या आंतर-क्षेत्रीय निवड चाचणी मधून पार पडली.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व संस्थेचे मार्गदर्शक करण पाटील यांनी सिद्धेशचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, इंजिनिअरिंग प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, आर. पी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांच्यासह प्रा. सतीश केदार, प्रा. शितल कुऱ्हाडे, प्रा. मंदार जोशी, प्रा. अजिंक्य किरदत आणि प्रा. निखिल शेरखाने यांनी सिद्धेशचा सन्मान करून कौतुक केले.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी धाराशिव जिल्ह्याला १,०९८ कोटींचे अभूतपूर्व अनुदान

आणखी मदतीसाठी पाठपुरावा सुरू : आ. राणाजगजितसिंह पाटील

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

अतिवृष्टी आणि महापुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा म्हणून आतापर्यंत तब्बल १,०९८ कोटी रुपयांचे अभूतपूर्व अनुदान मंजूर झाले आहे.

रब्बी हंगामासाठी जाहीर करण्यात आलेल्या अतिरिक्त मदतीचा शासन आदेश मंगळवारी निर्गमित झाला असून, त्यानुसार ५७७ कोटी रुपयांची नवीन मदत मंजूर झाली आहे, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार पाटील म्हणाले की, ऑगस्टमधील नुकसानीसाठी १८९ कोटी, सप्टेंबर महिन्यातील नुकसानीसाठी २९२ कोटी आणि खरवडलेल्या जमिनीसाठी ४० कोटी अशा एकूण ५२१ कोटी रुपयांचे अनुदान पूर्वीच मंजूर झाले होते. त्यात आता ५७७ कोटींची भर पडली असून, जिल्ह्याला एकूण १,०९८ कोटी रुपयांचा दिलासा मिळाला आहे.



यापुढेही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अधिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी सांगितले की, जून ते सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टीमुळे सहा शासन निर्णयांद्वारे नुकसानभरपाईची घोषणा करण्यात आली आहे.

आतापर्यंत सुमारे २७५ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली असून, उर्वरित रक्कमही लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल.

आमदार पाटील यांनी या अभूतपूर्व मदतीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जिल्हावासियांच्या वतीने आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी अत्यंत संवेदनशीलपणे शेतकऱ्यांच्या मदतीचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळाला आहे, असेही त्यांनी म्हटले.

### धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी ३,२९५ कोटींची मान्यता

धाराशिव जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी ३,२९५ कोटी रुपयांच्या सुधारित कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पात राज्य सरकारने पन्नास टक्के हिस्सा उचलण्यास मंजुरी दिली आहे. आमदार पाटील म्हणाले की, ठाकरे सरकारने राज्याचा वाटा वेळेवर दिला असता तर हा प्रकल्प आज पूर्णत्वास आला असता. मात्र, निधीअभावी किंमत ९०४ कोटींवरून ३,२९५ कोटींवर गेली. आता महायुती सरकारने निर्णायक पाऊल उचलून हा रेल्वे मार्ग साकार करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. आई तुळजाभवानीचे तीर्थक्षेत्र राष्ट्रीय रेल्वे नकाशावर आणण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित करत, मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

## हिरेमठात ६ ते १२ नोव्हेंबरदरम्यान श्री शिवलिंगेश्वर महास्वामीजींच्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -

नळदुर्ग येथील सुप्रसिद्ध सुक्षेत्र राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाचे निर्विकल्प समाधीस्थ राजगुरू श्री. ष. ब्र. १०८ शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन दि.६ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले असून, या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिरेमठाचे मठाधीपती श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले आहे.

या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत श्री व्याख्यान केसरी वे. प. सोमनाथ स्वामी धोत्री यांच्या रसाळ वाणीतून अध्यात्मिक प्रवचन होणार आहे. दि.११ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता जागरण व भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वा. महारुद्राभिषेक व दीक्षा अय्याचार हा धार्मिक विधी पार पडणार आहे. पुण्यस्मरणोत्सवाचा मुख्य सोहळा दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. संपन्न होणार असून, या धर्मसभेस विविध मठांतील पूज्य महास्वामीजी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये राजशेखर महास्वामीजी (विरक्त मठ, नंदगाव), जय शांतिलिंग महास्वामीजी (विरक्त मठ, हिरेनागाव), मल्लिकार्जुन महास्वामीजी (घटप्रभा), सुतरेश्वर शिवाचार्य महास्वामीजी (अचलेर), हुच्चेश्वर महास्वामीजी (हुच्चेश्वर संस्थान मठ, कमतगी), शंकर राजेंद्र महास्वामीजी (गच्चीन मठ, अमीनगड), मुरूघेंद्र महास्वामीजी (सोमशेखर मठ, मुनवळ्ळी), शिवबसवराजेंद्र महास्वामीजी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी (अणदुर), गंगाधर महास्वामीजी (जेवळी), शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी (जळकोट), जयमल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी (मुरूम), अभिनव शिवलिंग महास्वामीजी (मदनहिप्परगा), विरंतेश्वर महास्वामीजी (केसरजवळगा), बसवलिंग महास्वामीजी (अक्कलकोट) तसेच हिरेमठाचे मठाधीपती बसवराज शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित राहणार आहेत.

## धाराशिव जिल्ह्यातील विद्युत वाहिनींच्या दुरुस्ती करिता निधी मिळावा

भारतीय किसान संघ धाराशिवची ऊर्जामंत्र्यांकडे मागणी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -

जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे महापूर आला होता. यामध्ये वीज वाहून नेहणाऱ्या वीज तारांसह रोहित्र नुकसान झाले होते. याकरिता त्याची दुरुस्ती करणे, रोहित्र मधील तेल भरणे, विदयुत पोलची नवीन उभारणीसाठी विशेष निधी द्यावा अशी मागणी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डिकर यांची भारतीय किसान संघ जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी भेट घेऊन केली.

अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यामध्ये महावितरणचे झालेले नुकसान, जळालेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील रोहित्र, विद्युत वाहिनी दुरुस्ती कामे गती देणे, RDSS मध्ये नवीन कामांचा समावेश करावा इ. महावितरण कार्यालयातील विविध मागणीबाबत एक लेखी निवेदन दिले. मंत्री महोदयांनी तात्काळ कार्यकारी अभियंता यांना फोनवर संपर्क करून सर्व माहिती जाणून घेतली. व इतर विषयाबाबत कार्यकारी अभियंता महावितरण धाराशिव यांना सदरील निवेदनावर तात्काळ कारवाई करीता लेखी सूचना त्यांच्या स्वाक्षरीने देवून त्यांना सदरील निवेदन प्रत व्हॉट्सप केली.

## निकृष्ट महामार्गाच्या कामाबाबत जनतेचा संताप

### प्रकल्प संचालक व तहसीलदारांची पाहणी

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.५ नोव्हेंबर -

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट आणि निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, याच पार्श्वभूमीवर एन.एच.आय. प्रकल्प अधिकारी स्वप्निल कासार आणि तहसीलदार अरविंद बोंळगे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान चिवरी पाटी परिसरातील नागरिकांच्या घरांमध्ये महामार्गाच्या कामामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. तसेच बसस्थानकासमोरील उड्डाणपुलाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची देखील चौकशी करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी पुलाचा एक कोपरा ढासळण्याच्या



स्थितीत असल्याचे दाखवून दिले आणि गेल्या चौदा वर्षांपासून राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असूनही अद्याप पूर्ण का झाले नाही? असा सवाल उपस्थित केला.

अधिकाऱ्यांनी मधुशाली नगर आणि शिक्षक कॉलनी परिसरातील गटारींची पाहणी करून सध्यस्थिती जाणून घेतली. तथापि, काम केव्हा पूर्ण होणार? हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरितच राहिला आहे.

या पाहणीवेळी कार्यकारी अभियंता एस.जे. केत, भीमा बिराजदार, बसवराज चन्नशेट्टी, तसेच माजी सभापती दिपक आलुरे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, माजी सरपंच धनराज मुळे, भाजपा शहराध्यक्ष दीपक घोडके, सिद्धाराम धम्मुरे, बालाजी कुलकर्णी, करबसप्पा धम्मुरे, सोमनाथ शेटे, अनिल अणदूरकर, मकरंद भालकरे, रामेश्वर कबाडे आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते.

महामार्गाच्या कामाची पाहणी झाली खरी, मात्र हे काम पूर्ण होणार केव्हा आणि कोणत्या दर्जात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# रेती उपसासाठी लागणारे ६० लाखांचे साहीत्य नष्ट



## पोलीस-महसुलची संयुक्त कारवाई

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ नोव्हेंबर-**
मुदखेड पोलिस व महसूल यांनी अवैध रेती उपसा विरोधात कारवाई करुन ६० लाखांचा मुद्देमाल नष्ट केला आहे. हि कारवाई दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी पाचच्या सुमारास करण्यात आली.

मुदखेड तालुक्यातील वासरी, शंकतिर्थ आदी भागात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा, वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या संयुक्त पथकाने वासरी व शंकतीर्थ या परिसरात छापा टाकून प्रत्येक सात लाख रुपयांच्या पाच बोटी, दोन लाख रुपयांचे तराफे, तीन लाखांचे वाळू उपसा इंजिन, वीस लाखांचा मोठा फायबर असा एकूण ६० लाखांचा मुद्देमाल नष्ट केला. हि कारवाई पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, तहसीलदार आनंद देऊळगावकर, मारोतराव जगताप ,विश्वनाथ बोधमवाड, बाबुराव मुळेकर, राजू चव्हाण, गंगाधर मोरे, शेषराव कोटूरवार, राजकुमार मस्के, गोपाल माने, मनोज वाघमारे सर्व ग्राम महसूल अधिकारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल अंगद कदम, पोह-कवठेकर, पोकॉ रंजीत वानोळे, पोकॉ- संदीप कारामुंगे, पोकॉ अरविंद सिंगारपुतळे, पोकॉ गणपत बोरकर, महसूल सेवक,सुल्तान पठाण, कोकणे, पोलीस पाटील प्रताप पवार, टील, शुभांगी येडे व भावेश्वर मुंगल यांच्या पथकाने केली.

# वाळू माफिया विरोधात प्रशासनाची धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ नोव्हेंबर-**
मागील काही दिवसांपासून लोहा व मुदखेड तालुक्यातील चोरटे वाळू माफिया नायगाव, उमरी व मुदखेड तालुक्यात गोदावरी पात्रात टायटॅनिक जहाजा सारख्या मोठ मोठ्या सक्शन पंपांच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करत असल्याची बातमी दै.तरुण भारत मध्ये प्रकाशित केली होती. या वृत्तानंतर आज बुधवारी दि. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे महसूल विभागाने धाडसी पाऊल उचलत बरबडा, अंतरगाव परिसरात पाठलाग करून थरारक कारवाई करत दोन फायबर बोटी जप्त करून थेट स्फोटक लावून उडवल्या. या कारवाईने वाळू माफियांमध्ये चांगलीच धांदल उडाली आहे.





**तरुण भारत इफेक्ट**

गोदावरी पात्रातून अवैधरीत्या उपसली जाणारी वाळू येळी, कौडगाव, नांदगाव, चिंचोली, कामळज,ईळेगाव ,आदी ठिकाणी विकली जात असल्याचे उघड झाले होते. माफियांचे हे मोठे रॅकेट नायगाव व उमरी महसूल अधिकाऱ्यांना चकवत होते. बुधवारी पहाटे नायगाव तालुक्यातील बरबडा वाडी येथून नदीपात्रातून जाणारी बोट गस्त घालणाऱ्या पथकास दिसली त्यानंतर त्या बोटीचा सहाय्याने बोटीनेच पाठलाग केला असता लपवून ठेवलेल्या दोन बोटी उमरी तालुक्यातील येळेगावच्या हद्दीमध्ये दिसून आल्याने नायगाव व उमरी येथील महसूल विभागाने एकत्र येऊन संयुक्त कारवाई केली.

दि.५ नोव्हेंबर रोजी बुधवारी पहाटे ४.३० वाजता धर्माबादचे उपविभागीय अधिकारी दाभाडे, बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी सौ. क्रांती डोंबे, नायगावच्या तहसीलदार सौ. धम्मप्रिया गायकवाड, उमरीच्या महसूल अधिकाऱ्यांसह मंडळ अधिकारी आरु, मंडळ अधिकारी कावळे, तलाठी हसनापल्ले आणि चालक तुकाराम पुरी यांनी बरबडा-अंतरगाव परिसरात दोन्ही बाजूंनी वेढा घालून थरारक कारवाई केली.

या कारवाईत दोन फायबर बोटी नदीपात्रात आढळल्याने त्या जप्त करण्यात आल्या आणि त्यानंतर स्फोटकांच्या सहाय्याने ब्लास्ट करून त्यांना नष्ट करण्यात आले. या कारवाईने वाळू माफियांचे कंबरडे मोडले आहे. महसूल विभागाने केलेली कारवाई व दै. तरुण भारत ने घेतलेला बातमीचे चे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ज्युदो स्पर्धेत ऋतुराज केंद्रेसह नागेश लुटेला सुवर्ण पदक





**नांदेड** -कंधार तालुक्यातील दिग्रस बु. येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडूंनी सुवर्ण पदके पटकावत विद्यालयाचा नावलौकीक केला आहे. नुकतेच विभागीय ज्युदो स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विद्यालयातील इयत्ता अकरावीमध्ये शिकत असलेल्या ऋतुराज केंद्रे या खेळाडूने ४० किलो वजन गटात तर नागेश लुटे या खेळाडूने ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांक घेत सुवर्ण पदक पटकाविले. खेळाडूंच्या या यशाबद्दल शालेय समिती अध्यक्ष विश्वंभर पाटील, मुख्याध्यापक एच.एस. बोड्डावार, पर्यवेक्षक बी.डी. होनराव यांच्यासह नारायण लुटे व मित्र मंडळाने अभिनंदन केले आहे.

## भाजप बाऱ्हाळी मंडळ अध्यक्षपदी मनोज कांबळे यांची नियुक्ती

**मुखेड-**भारतीय जनता पार्टी च्या आ.डॉ.तुषार राठोड यांच्या नेञत्वात मुखेड येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बा-हाळी मंडळ अनुसूचित



जाती अध्यक्ष पदावर मनोज गोविंदराव कांबळे सावरगावकर यांची नियुक्ती करण्यात आली असुन नियुक्तीचे पत्र भाजप बा-हाळी मंडळ अध्यक्ष बालाजी पाटील सकनुरकर यांनी दिली. मनोज कांबळे यांनी मागील काळात भाजपाचे आमदार डॉ.तुषार राठोड यांच्या नेञत्वात सामाजिक, राजकिय क्षेञात केलेल्या महत्वपूर्ण कामाची दखल घेऊन ही नियुक्ती दिली आहे. दिलेल्या नियुक्ती मुळे पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यास तसेच पक्षविस्तारासाठी यांचे काम उल्लेखनीय रहाणार आहे. या नियुक्तीबद्दल मनोज कांबळे यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यास अनेकांनी शुभेच्छा देत आहेत.

## संभाजी ब्रिगेड पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी सारंग मिराशे

**नांदेड-**संभाजी ब्रिगेड पार्टीच्या तालूकाअध्यक्षपदी येथील सामाजिक कार्यकर्ते सारंग पाटील मिराशे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष कमलेश पाटील कदम यांच्या हस्ते त्यांना नुकतेच देण्यात आले आहे. सारंग मिराशे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक चळवळींमध्ये काम करतात. त्यांच्या कार्याची दखल संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेने घेतली असून त्यांच्या निवडीबद्दल त्यांच्या मित्र परिवारांतून अभिनंदन केले जात आहे.

# जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे हदगावात आयोजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव/ निवघा बा., दि. ५ नोव्हेंबर-**
जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा व प्रवचन दर्शन सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता हदगाव शहरातील नांदेड रोड ,बी. एस.एन.एल. कार्यालयासमोर, हदगाव शहर जिल्हा नांदेड येथे करण्यात आले आहे अशी माहिती मराठवाडा उपपीठ पीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, पीठ व्यवस्थापक सुरेश मोरे, जिल्हा निरीक्षक बजरंग दायमा, जिल्हाध्यक्ष मुंडकर, हदगाव तालुका अध्यक्ष पांडुरंग नरवाडे यांनी दिली. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थांच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्राम स्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर ,वैद्यकीय उपक्रमांतर्गत



मोफत दवाखाना, मरणोत्तर देहदान ,मोफत रुग्णवाहिका सेवा महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत.

या कार्यक्रमानिमित्त हदगाव शहरातून जगद्गुरुश्रींच्या पादुकांची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यामध्ये विविध देखावे यांचे सादरीकरण होणार आहे. जगद्गुरुश्रींच्या पादुकांचे संतपिठावर आगमन झाल्यानंतर विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. यामध्ये गुरु पूजन, उपासक दीक्षा, आरती सोहळा, जगद्गुरुश्रींचे प्रवचन,प्रवचनकाराचे अमृततुल्य प्रवचन, दर्शन सोहळा, पुष्पवृष्टी असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

तसेच उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सामाजिक उपक्रमांतर्गत समाजातील गरजवंतांना २९ मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी दिवसभर येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या नयनरम्य सोहळ्यासाठी जिल्हा सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, तालुका सेवा समितीचे पदाधिकारी,सेवा केंद्र समितीचे पदाधिकारी , आरती केंद्र समितीचे पदाधिकारी,युवासेना, हिंदू संग्राम सेना, महिला सेना, प्रवचनकार, गुरु सेवक ,प्रोटोकॉल अधिकारी, आजी व माजी पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त भक्तगण, उपासक, साधक ,शिष्य ,हितचिंतक यांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून या नयनरम्य सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन पीठ प्रमुख, पीठ व्यवस्थापक, जिल्हा निरीक्षक, जिल्हा अध्यक्ष, जिल्हा समितीचे पदाधिकारी, तालुका समितीचे पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तथागत नगर येथील विहाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ नोव्हेंबर-**
शहरातील तथागतनगर येथील मुलगंध कुटी विहाराकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे निर्माण झाले असून, यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील तथागत नगर भागातील मुलगंध कुटी विहाराकडे जाणाऱ्या मार्गावर मागील अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढिगारे साचलेले आहेत. यामुळे विहाराकडे जाणऱ्या उपासकांना, परिसरातील नागरिकांना या कचऱ्याच्या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, यामुळे आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. या मार्गावरील कचरा उचलण्यात यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा महापालिकेकडे केली. परंतु त्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत असून, तातडीने उचलावा, अशी मागणी होत आहे.

# मुदखेड येथे वंदे मातरम् गीत सामूहिक गायन कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ नोव्हेंबर-**
वंदे मातरम हे गीत भारताचे राष्ट्रीय गीत आहे त्याची रचना बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ मध्ये केली होती.

वंदे मातरम हे गीत भारताचे गौरवशाली प्रतीक आहे. हे गीत गाताना आपल्या देशभक्तीची आणि राष्ट्रीय एकतेची जाणीव होते.

वंदे मातरम या गीताला १५० वर्ष झाल्याच्या उपलक्ष्यात महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ७ नोव्हेंबर रोजी शहरातील क्रीडा संकुल मैदान येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मुदखेड तालुका प्रशासन, शाळा, महाविद्यालये, आणि विविध शैक्षणिक संस्था सहभागी होणार असून दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वाजता शहरातील क्रीडा संकुल मैदान येथे सामूहिक गायन कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती (बंदा बैरागी बंदा सिंघजी बहादुर) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस.एस.परघणे यांनी दिली आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती गटित करण्यात आली असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# मांजरम जिल्हा परिषद गटात ऐश्वर्या रातोळीकर यांची उमेदवारी चर्चेत

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ६ नोव्हेंबर-**
नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद मांजरम गट हा यंदा अनुसूचित जाती (महिला) राखीव ठरल्यानंतर राजकीय समीकरणांना वेग आला आहे. या गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट)कॉंग्रेस पार्टीने सर्वात आधी तयारी सुरू करत वातावरण आपल्या बाजूने वळवण्याची मोहिम हाती घेतली आहे.



राष्ट्रवादीकडून रातोळी येथील माजी उपसरपंच तथा भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य गंगाधर पटने रातोळीकर यांच्या कन्या कु. ऐश्वर्या गंगाधर पटने रातोळीकर यांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल केला आहे. यांनी पक्षाकडे केलेल्या उमेदवारी अर्जामुळे या गटात राजकीय रंगत वाढली असून ऐश्वर्या रातोळीकर राष्ट्रवादीकडील प्रबळ दावेदार ठरणार आहेत.

नुक्तेच नायगाव येथे झालेल्या आढावा बैठकीत माजी सरपंच गंगाधर पटने रातोळीकर यांनी आपल्या कन्येचा अर्ज पक्षश्रेष्ठींकडे सुपूर्द केला. यावेळी विश्वंभर पाटील, दत्तराम पाटील, नंदू पाटील, ताजुद्दीन, विलास पाटील, सतीश ईंगोले, मुकदम बालाजी पाटील, अंकुश पाटील, राम पाटील, शंकरराव पांचाळ, शंकरराव गोपछडे आदी उपस्थित होते.


जि.एन.एम. पदवीधर असलेल्या ऐश्वर्या रातोळीकर या उच्चशिक्षित, मितभाषी व शिस्तप्रिय कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या नेतृत्वात गडगा, टेंभुर्णी, मरवाळी, माहेगाव, कोलंबी, दरेगाव, आंचोली, मांजरम, मोकासदरा, लालवंडी, नरंगल आदी गावांमध्ये जनसंपर्क मोहिमेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला आहे.

माजी उप सरपंच गंगाधर पटने रातोळीकर यांनी आपल्या कार्यकाळात गावोगावी जाऊन सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाशी थेट संवाद साधला.

# देगलूर नगरपरिषदेच्या रणांगणात होणार तिरंगी झुंज!

**मिलिंद वाघमारे**
**देगलूर, दि. ५ नोव्हेंबर-**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पार्टीकडून जय्यत तयारी चालू आहे. सध्या स्थानिक नेत्यांच्या हालचालीचा वेग वाढला असून यंदा तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यात कॉंग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी आमने-सामने असतील तर इतर पक्षांची भूमिकाही निर्णायक ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

देगलूर शहर तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याच्या त्रिसीमेवर वसलेले असून नांदेड शहरानंतर महत्वाचे म्हणून शहर म्हणून देगलूरची ओळख आहे. नुकतेच नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याने स्थानिक नेत्यांकडून निवडणूकच्या परिक्षेचे अभ्यास आणि व्यूहरचना आखली जात आहे. सध्या राजकीय हालचालींना चांगलेच वेग आले असून हेवेदावे, गटबाजी, पक्षांतर आणि आरोप-प्रत्यारोप हे देगलूरांच्या चर्चे चा केंद्रबिंदू ठरत आहेत. राजकीय वर्तुळात दिवसेंदिवस बदल होत असले तरी यंदाची निवडणूक मात्र चुरशीची होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भारतीय जनता पार्टी हे पक्ष आघाडीवर आहेत. परंतु शिवसेना (एकनाथ शिंदे गट), शिवसेना (उबाठा गट), वंचित बहुजन आघाडी, ए.आय.एम. आय.एम आणि विविध सामाजिक संघटना यांची भूमिकाही तेवढीच निर्णायक ठरणार आहे.



भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून मनोरमा मण्णाजी निलमवार यांचे नाव नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत अधिकृत घोषणा करण्यात आली. तर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) या पक्षाकडून विजयमाला बालाजी टेकाळे यांचे नाव जवळपास निश्चित असल्याचे सांगण्यात येते. सध्या भारतीय जनता पार्टीकडून अद्याप नगराध्यक्ष पदाचा उमेदवार घोषित करण्यात आलेला नसला तरी देगलूर येथील मोंढा मैदानावर दि. ०३ नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या जनसंवाद सभेत प्रामाणिक आणि स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार घोषित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले त्यामुळे भाजपाचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण? ही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. भाजपाच्या सर्वेक्षणात आघाडीवर असणाऱ्या उमेदवाराच्याच गळ्यात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची माळ पडणार हे मात्र निश्चित!

प्रशासकीय आकडेवारीनुसार देगलूर शहरात २२ हजार ७८२ पुरुष मतदार तर २२ हजार ४६५ महिला मतदार आहेत. तब्बल ४५ हजार २४७ मतदार आगामी निवडणुकीत सत्तावीस लोकप्रतिनिधींच्या जागेचे भविष्य ठरवणार आहेत. त्यामुळे तुर्तास तरी मतदारांचे भाव वधारले आहे. परंतु सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि पक्षांतराचे सत्र चालूच आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत मतदारराजा कोणावर दिलदार होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. शहरातील तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न, महिलांच्या सक्षमीकरणाची मुद्दा, शैक्षणिक संकुलाची उभारणी, नाली, रस्ते,पाणी, वीजपुरवठा आणि गटार योजना यासारखे मूलभूत प्रश्न कोणत्या पक्षाचा अजेंडा असणार आहे. मागील काळात त्या-त्या पक्षांची आणि प्रतिनिधीची भूमिका काय राहीली आहे याचाही विचार मतदारराजा करणार असल्याचे सांगण्यात येते आहे. त्यामुळे आतातरी राजकीय भाकित करणे अवघड आहे मात्र ही निवडणूक चुरशीची होणार असल्याची चर्चा आहे.

मागील काळात कॉंग्रेसची सत्ता नगरपरिषदेवर होती. त्यामुळे सत्तेतील कामगिरीचा आलेख माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार आणि त्यांच्या शिलेदारांकडून जनतेसमोर ठेवले जाईल. तर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडून लक्ष्मीकांत पदमवार हे राष्ट्रवादीच्या रथाचा सारथी म्हणून भूमिका कशी वटवणार ? यावरही भवितव्य ठरवणार आहे. तसेच देशात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीची सत्ता असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही सत्ता प्रस्थापनेसाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली जाईल. सध्या देगलूर - बिलोली मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर यांच्या माध्यमातून सत्तेची समीकरणे कशी आखली जातील, भाजपातील जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांचे सूर जुळविण्यावरही विजयाची गणित ठरणार आहे. राज्यसभेचे खा. अशोक चव्हाण आणि खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वाची परीक्षा असणार आहे. तसेच संघाच्या तत्वप्रणालीचा अवलंब करीत निवडणूक लढविल्यास नगरपरिषदेवर कमळ फुलण्यासाठी शक्यता आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत विविध घटकांची गोळाबेरीज करीत राजकीय समीकरणे जुळवणाऱ्यांवर आघाडीच्या पक्षाकडून भर दिला जाईल. त्याचबरोबर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षात बालाजी पाटील खतगावकर यांच्यामार्फत राजकीय हालचाली होत आहेत, परंतु त्या कितपत यशस्वी ठरतील हे सांगणे कठीण आहे. तर शिवसेना (उबाठा गट) हे पक्ष महाविकास आघाडीसोबत असल्यास कॉंग्रेस पक्षाला बळ मिळेल पण मुस्लिम समाजाची नाराजी भोवल्यास विजयाची वाटचाल खडतर होण्याची शक्यता आहे. याचाच फायदा घेत ए.आय.एम.आय.एम नगराध्यक्ष पदाचा उमेदवार देणार का? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. तर वंचित बहुजन आघाडीने आजतागायत स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. स्थानिक नेते आणि कार्यकर्ते संभ्रमात पडले असल्याची माहिती समोर आली आहे. एकूणच या सर्व घडामोडींचा विचार केल्यास तिरंगी लढत होईल परंतु निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही इतर पक्षांचे व संघटनांचे मनोमिलन झाल्यास चौथी आघाडी सुद्धा निर्माण होऊ शकेल. असे घडल्यास आश्चर्याचे कारण नाही.

## टि.सी. हरवली

माझी कोमल अशोक कुंटे हिची १२ विज्ञान शाखा उत्तीर्ण श्री छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड या महाविद्यालयात उत्तीर्ण झालेली मुक्रामाबाद ते देगलूर बसने प्रवास करताना हरवली आहे.

**संपर्क**
**सत्यम नगर, देगाव रोड देगलूर**
**मो. ८८५५९२३६०६**

## किनवट शिक्षण संस्था, किनवट

F175

### सभेची सुचना

दि.०६.११.२०२५

सर्व सभासदांस कळविण्यात येते की दिनांक २३.११.२०२५ मंगळवार रोजी सकाळी १०.०० वा. बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा ता.किनवट जि. नांदेड येथे संस्थेच्या कार्यालयात सर्वसाधारण सभा प्रफुल्ल प्रकाश राठोड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित रहाण्याची कृपा करावी.

**सभेपुढील विषय:**
१) मागील वृत्तात वाचून कायम करणे.
२) कार्यकारी मंडळातील सभासदांची निवड करण्यासाठी निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक घेणे बाबत.
३) अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

**शंकर चाडावार**
**सचिव**
**किनवट शिक्षण संस्था,**
**किनवट जि. नांदेड**